रायगड, सोमवार दि. १५ मे २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

पालीत नालेसफाई प्रलंबित

पान ३ वर

दिल्लीने गाशा गुंडाळला



पान ८ वर

'न्यायभवन'ला न्याय कधी?

। अलिबाग । प्रमोद जाधव ।
वंचित घटकांसाठीच्या विविध योजनांची आखणी व अंमलबजावणीसाठी उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाची अवस्था जीर्ण झाली आहे. निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे ही इमारत धोकादायक ठरली आहे. मात्र, या इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी लाखो रुपये खर्च करण्याकडे वेळ अधिक दिला जात आहे. इमारत खराब झाल्यापासून आठ वर्षांत दोन वेळा स्ट्रक्चरल ऑडिट केले असून, पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. त्यामुळे स्ट्रक्चरल ऑडिटच्या या फेऱ्यात सापडलेल्या इमारतीला नव्या सामाजिक न्याय भवनची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

॥नादुरुस्त इमारतीमुळे कार्यालये विखुरली

॥स्ट्रक्चरल ऑडिटवर लाखोंचा खर्च

अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभागामार्फत अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्यात आले. यासाठी दोन कोटी ७३ लाख ९४ हजार ७०० •> पान २ वर

समाजकल्याण, जात पडताळणी कार्यालये भाड्याच्या घरात

गोंधळपाडा येथील इमारत धोकादायक ठरल्याने सामाजकल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय गेल्या तीन वर्षांपासून चेंढरे येथील कच्छी भवन या ठिकाणी आहे. दर महिन्याला एक लाखपेक्षा अधिक रक्कम भाडे द्यावे लागत आहे. तसेच जात पडताळणी कार्यालय चेंढरे येथे आनंदनगर परिसरात असून, या दर महिन्याला सुमारे ९० हजार रुपये भाडे भरावे लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागान जीर्ण झालेल्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधणीसाठी प्रयत्न केले असते, तर त्या खर्चात तीन वर्षांत नवीन इमारत बांधता आली असती, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

> सामाजिक न्याय भवनच्या इमारतीबाबत वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. ही इमारत नव्याने बांधून द्या, अशी मागणी केली आहे. या इमारतीच्या दोन वेळा झालेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये तफावत का आहे? तिसरे स्ट्रक्चरल ऑडिट झाले की नाही? तसेच आम्हाला सुसज्ज इमारत कधी मिळणार, असे प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपस्थित करण्यात आले आहेत.
>
> - सुनील जाधव, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग

एकत्र निवडणुका लढविण्यावर एकमत

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात महाविकास आघाडी म्हणून आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुका लढवण्यावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाचे एकमत झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे निवासस्थान सिल्वर ओकमध्ये रविवारी (दि. १४ मे) मविआची बैठक पार पडली. या बैठकीत आगामी काळातील वाटचालीबाबत चर्चा झाली असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक पार पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील, काँग्रेसचे नाना पटोले आणि शिवसेना ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी संयुक्तपणे पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी बोलताना जयंत पाटील यांनी म्हटले की, भाजपचा कर्नाटकमध्ये मोठा पराभव झाला आहे. •> पान २ वर

महाविकास आघाडीची बैठक

> महाराष्ट्रातील जनतेला ठाम पर्याय सक्षमपणे देण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न असेल. महाविकास आघाडी कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरून अधिक ताकदीने पुढील काळात काम करेल.
>
> - जयंत पाटील, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष

वेधक

अकोल्यात संचारबंदी

अकोला : अकोला शहरातील हरिहरपेठमध्ये मध्यरात्री दोन गटांमध्ये मोठी दंगल उसळली. या राड्यात अनेक वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली आहे. दंगलखोरांनी अनेक दुचाकी, चारचाकी पेटवल्या तसेच अग्निशमन दलाच्या वाहनांची देखील तोडफोड केली आहे. या दंगलीत दोन्ही गटांमधील दहा जणांसह दोन पोलीसही जखमी झाले असून, शहरातील अनेक भागांमध्ये कलम १४४ लागू करण्यात आलं आहे.

सीबीआयच्या संचालकपदी प्रवीण सूद

मुंबई : कर्नाटकचे पोलीस महासंचालक प्रवीण सूद यांची केंद्रीय अन्वेषण ब्युरोचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सीबीआयचे प्रमुख सुबोध कुमार जयस्वाल यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सूद २५ मे रोजी पदभार स्वीकारतील. डीजीपी सूद हे १९८६ च्या बॅचचे कर्नाटक केडरचे आयपीएस अधिकारी आहेत.

शेकापतर्फे न्हावे येथे रुग्णवाहिकेचे लोकार्पण

सभागृहाचे उद्घाटन, ४०० लाभार्थ्यांना मोफत चष्मेवाटप

। रोहा । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून समाजसेवेच्या उदात्त हेतूने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामीण भागातील जनतेची सेवा करण्याच्या उद्देशाने रविवारी रोहा तालुक्यातील न्हावे येथे रुग्णवाहिकेचे लोकार्पण शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. •> पान २ वर

चित्रलेखा पाटील यांची उपस्थिती

भात गिरणीवर 'मविआ'ची सत्ता

दहापैकी नऊ जागांवर विजय

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कशेळे सहकारी भातगिरणी संस्था निवडणुकीत महाविकास आघाडीचे निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या महाविकास आघाडीने विरोधकांचा पराभव करीत विजय मिळविला. या निवडणुकीत ज्येष्ठ कार्यकर्ते तानाजी मते पॅनेलने भात गिरणी ताब्यात घेताना दहापैकी नऊ जागांवर विजय मिळविला आहे.

कशेळे सहकारी भातगिरणी मर्यादित कशेळे या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक रविवार, दि. १४ मे रोजी पार पडली. भात गिरणीवर दहा जागांसाठी सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यात इतर मागासवर्गीय विभागातून महेश जनार्दन पेमारे आणि अनुसूचित जाती जमाती जागेवर संचालक म्हणून भीमराव जाधव हे बिनविरोध निवडून आले होते. त्यामुळे आठ जागांसाठी निवडणूक झाली. शेतकरी कामगार पक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या महाविकास आघाडीसमोर विरोधकांनी आव्हान निर्माण केले होते. •> पान २ वर

महिला अत्याचार प्रकरणाला वेगळे वळण

। पेण । प्रतिनिधी ।

पेण पोलीस ठाण्यामध्ये ६ जानेवारी २०२३ पासून अमर पाटील, सुजीत पाटील आणि या दोघांच्या पत्नी यांची परस्परांविरुद्ध विधाने नमूद करून घेतली असून, तेव्हापासून यांच्यात वाद सुरू आहे. अखेर या वादाने एक वेगळेच वळण घेऊन परस्परांना जीवे मारण्यापर्यंत मजल पोहोचली आहे. त्याबाबत पेण पोलीस ठाण्यात परस्परांविरूद्ध गुन्हे दाखल झाले असले तरी बलात्काराचे आरोप झालेल्यांवर अजूनही कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पेण पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, या गुन्ह्यातील पीडित महिलेवर आरोपी अमर पाटील याने खोपोली बायपास रोडवर गाडीमध्ये अत्याचार केला. त्यानंतर या पीडित महिलेवर तिच्या राहत्या घरात जाऊन तिच्या इच्छेविरुद्ध शारिरीक संबंध प्रस्तापित केले. यात ती गरोदर राहिली. त्यानंतर यातील आरोपीने गर्भपात करण्यासाठी गोळ्या दिल्या. गर्भपात करून तिच्यासह मुलीला व नवऱ्याला जीवे मारण्यासह तिची बदनामी करण्याचीदेखील धमकी दिली. हा प्रकार पीडित महिलेच्या नवऱ्याला समजताच तो समजूत घालण्यासाठी आरोपी अमर याच्या घरी गेला असता, यातील पीडित महिलेला आरोपीने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. यातील आरोपीचे वडील सुरेश तथा सूर्यकांत पाटील यांनी पीडित महिलेला दम देत सांगितले की, मला तुम्ही ओळखत नाहीत, मी काहीही करू शकतो. मी वाघ आहे, तुझ्या नवऱ्याला एका गोळीत मारेन, त्याला सोडणार नाही. याबाबतची हकीकत पीडित महिलेने पेण पोलीस ठाण्यात सांगितली असून, त्यानुसार पेण पोलीस ठाण्यात अमर पाटील, त्याची पत्नी, आई व वडील सुरेश पाटील यांच्याविरुद्ध भा.दं.वि.स.क. ३७६, ३७६ •> पान २ वर

> परस्पर विरोधी गुन्ह्यामध्ये फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांकडून कलम नोंदण्यात आले. परंतु, महिलेचा विनयभंग झाला आहे. त्याचप्रमाणे महिलेवर वारंवार बलात्कार झाला आहे, तसेच महिलेच्या इच्छेविरुद्ध गर्भपातदेखील झाला आहे. मात्र, महिलेच्या फिर्यादीनुसार आरोपी असलेल्यांना अटक झालेली नाही. याउलट, सुजीत पाटील हा सर्वसामान्य कुटुंबातील असल्याने त्याला त्वरित अटक झाली, अशी चर्चा चालू आहे.

पूर्ववैमनस्यातून तिघांवर चाकूहल्ला

। महाड । प्रतिनिधी ।

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चांढवे बुद्रुक येथे शनिवार, दि. १४ मे रोजी संयुक्त जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी आलेल्या तिघा तरुणांवर आरोपीने चाकूने वार केल्याची घटना घडली आहे. या घटनेतील एक गंभीर जखमी झाला आहे. याबाबत आठ जणांविरोधात पोलिसांत हाफ मर्डरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील धारवली येथील युवक प्रथम संतोष सकपाळ (२१) याने मागील राग मनात धरून चांढवे बुद्रुक गावातील उनित सुनील जाधव (२३), विकास गौतम जाधव (३२), •> पान २ वर

बॅनरबाजी रोखण्यात अपयश

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

शहरातील बेकायदेशीर बॅनरबाजीला आळा घालण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पालिकेच्या मुख्यालयासमोरच विनापरवानगी राजकीय बॅनरबाजी करण्यात येत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. पनवेल पालिकेच्या मुख्यालयासमोरच हा प्रकार घडत असल्याने बॅनरबाजी करून शहर विद्रुपीकरण करणाऱ्यांकडून प्रशासनाला एका प्रकारे आव्हानच दिले जात आहे. यामुळे विनापरवानगी बॅनरबाजी करणाऱ्यांवर वचक बसवण्यात पालिकेचे अतिक्रमण विभाग अपयशी ठरत असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

पालिका हद्दीत बॅनरबाजी करण्यासाठी पालिकेच्या परवाना विभागाकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता बॅनरबाजी करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या बॅनरबाजी करणाऱ्यांमध्ये जवळपास सर्वच राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असून, •> पान २ वर

पालिका मुख्यालयासमोरच झळकले राजकीय बॅनर

कुत्रा चावल्याने तरुणाचा मृत्यू

। रोहा । प्रतिनिधी ।

दोन महिन्यांपूर्वी कुत्रा चावल्याने जखमी झालेल्या युवकाचा शुक्रवारी मुंबईत कस्तुरबा रुग्णालयामध्ये उपचार सुरू असताना मृत्यू झाला. अमित कोळंबेकर (३८) असे या युवकाचे नाव आहे.

दोन महिन्यांपूर्वी ब्राह्मण आळीतील राहत्या इमारतीमध्ये गाडी पार्क करत असताना त्यास कुत्र्याने चावा घेतला होता. ३८ वर्षीय अमितने त्याकडे दुर्लक्ष केले अन् त्याला रेबिजची लागण झाली. मात्र, शुक्रवारी सकाळी अचानक त्याची प्रकृती खालावल्याने माणगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तिथे उपचाराला प्रतिसाद मिळत नसल्याने त्याला मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात दाखल केले. तिथे उपचार घेत असताना त्याचा मृत्यू झाला. तरुण मुलाचा अचानक मृत्यू झाल्याने कोळंबेकर कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. रोहा अष्टमी शहरात सध्या मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. दीड महिन्यांपूर्वी पिसाळलेल्या कुत्र्याच्या हल्ल्यात एकाच दिवशी चार जण गंभीर जखमी झाले होते. •> पान २ वर

पर्यटकांची रायगडला पसंती

उन्हाळी सुट्टीत किनारे फुलू लागले

अलिबाग । प्रतिनिधी ।
गेल्या महिन्याभरापासून जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात तापमान वाढत आहे. वाढते तापमान नकोसे झाले आहे. त्यामुळे उन्हाळी सुट्टी घालविण्यासाठी मुंबई, पुण्यासह अन्य जिल्ह्यातील पर्यटकांनी रायगड जिल्ह्याला पसंती दिली आहे. दररोज हजारोंनी पर्यटक रायगडमध्ये येऊ लागले आहेत. त्यामुळे अलिबागसह अन्य समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलून गेले आहेत. अनेक पर्यटनस्थळांवर विशेष करून किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

(छायाचित्र : श्रेया फोटो)

ताज्या मासळीवर ताव

रायगड जिल्ह्यामध्ये आल्यावर पर्यटक मासे खाण्यावर अधिक भर देत आहेत. पापलेट, सुरमई, बांगडा, कोलंबी, चिंबोरी, शिंपल्या अशा प्रकारचे ताजे मासे फ्राय करून खाण्याला पर्यटक पसंती दर्शवित असल्याचे हॉटेल व्यावसायिकांकडून सांगण्यात येत आहे.

दहावी, बारावीच्या परीक्षा झाल्यानंतर पहिली ते नववी व अन्य व्यावसायिक शिक्षणाच्या परीक्षा सुरु झाल्या. या परीक्षा एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत पूर्ण झाल्या. परंतु, जिल्ह्यात तापमानात अचानक बदल झाला. •> पान २ वर



अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ मे

१) श्री. मनोहर आत्माराम राऊत
१५-५-१९४०
नवगाव, अलिबाग

२) श्री. मधुकर पुरुषोत्तम किल्लेकर
१५-५-१९५१
श्रीबाग, अलिबाग

३) श्रीम. राजश्री बळीराम पाटील
१५-५-१९५२
अलिबाग

४) श्री. शंकर रामा मोर्ले
१५-५-१९५२
कोळीवाडा, अलिबाग

मेगाब्लॉकने प्रवाशांची दमछाक

। पनवेल । वार्ताहर ।

हार्बर मार्गावर वाशी-पनवेलदरम्यान रविवारी (ता. १४) घेण्यात आलेल्या मेगाब्लॉकमुळे चाकरमान्यांसह बाहेरगावी जाणाऱ्यांचे चांगलेच हाल झाले. यावेळी ट्रान्स हार्बर मार्गावरील ठाणे ते वाशी ही सेवा सुरू होती; परंतु सध्या सुट्ट्यांचा हंगाम असल्याने लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी पनवेल, सीएसएमटी तसेच कल्याण स्थानक गाठताना प्रवाशांची चांगलीच दमछाक झाली होती. ट्रान्स हार्बर मार्गावर मेगाब्लॉक असल्यामुळे रेल्वे स्थानक परिसरात शुकशुकाट पसरला होता; तर एनएमएमटीच्या बस स्थानकांवर मात्र प्रवाशांची गर्दी जमली होती; तर मेगाब्लॉकमुळे रेल्वेच्या फेऱ्या देखील उशिराने असल्यामुळे रिक्षाने तसेच बस, एनएनएमटीने प्रवास करवा लागला; तर भर उन्हामुळे प्रवाशांना रेल्वे स्थानकांत अडकून पडावे लागले होते.

माथेरानमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांचा जल्लोष

। माथेरान । वार्ताहर ।

कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला एकहाती सत्ता स्थापन करण्यात यश आले आहे. याच पार्श्वभूमीवर सर्वत्र काँग्रेस पक्षाचा जल्लोष सुरू असून माथेरानमध्ये देखील काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष करीत आनंदोत्सव साजरा केला. कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी जाहीर झाला. यामध्ये काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. या निकालानंतर देशभरातील काँग्रेस पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी आनंद व्यक्त करीत होते. अशाच प्रकारे येथे माथेरानमध्ये देखील काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी माथेरानमधील मुख्य बाजारपेठेत असलेल्या श्रीराम चौकात सायंकाळी सर्वांनी एकत्रित येत येथे फटाक्यांची आतषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी माथेरान काँग्रेस शहर अध्यक्ष विजय कदम, उपाध्यक्ष बिलाल महाबळे, मंगेश मोरे, अरविंद रांजाणे आणि महिला कार्यकर्त्या आशा कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्तेदेखील येथे उपस्थित होते.

बेशिस्त वाहन चालकांना दणका

पाच दिवसात तब्बल दहा लाखांचा दंड वसूल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात वाढत्या नागरीकरणाबरोबरच दळणवळणाची साधने वाढली आहेत. वाहनांची संख्या झपाट्याने वाढू लागल्या आहेत. मात्र, वाहन चालविताना अनेक जण वाहतुकीच्या नियमांचे दुर्लक्ष करून बेशिस्तपणे वाहन चालवितात. त्याचा परिणाम अनेकांना मोटार अपघातामध्ये कायमचे अंपगत्व, तर काहींना मृत्यू जवळ करण्याची वेळ येते. या बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या माध्यमातून कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. मागील पाच दिवसांत दीड हजार वाहन चालकांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून दहा लाख ५७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे. पर्यटकांसह जिल्ह्यातील नागरिकांना प्रवास सुखकर व्हावा यासाठी जिल्ह्यात वेगवेगळ्या योजनेंतर्गत रस्त्यांची कामे जोरात सुरु आहेत. काही ठिकाणी पूर्ण झाली असून, अनेक ठिकाणी अद्याप रस्त्यांची कामे अर्धवट आहेत. पर्यटनाबरोबरच औद्योगिकीरणाचा विस्तारदेखील वाढू लागला आहे. वेगवेगळे प्रकल्प जिल्ह्यात येऊ लागले आहेत. त्यामुळे नागरीकरणही वाढत आहे. रस्त्यांचे जाळे पसरल्याने वाहनांची गरजही निर्माण झाली आहे. दुचाकी वाहनांसह तीन, चारचाकी वाहने मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहेत. त्यात वेगवेगळे प्रकल्प उभे राहात असल्याने अवजड वाहने खरेदीवर भर दिला जात आहे. दरम्यान, वाहन चालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन सर्रासही करताना आढळून येत आहेत. वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे, ट्रिपल सीट घेणे, रस्त्यावर वाहन उभे करणे, वाहन परवाना नसणे, ज्यादा प्रवासी वाहतूक, वाहन चालविण्याचा परवाना नसणे, अवजड वाहनातून नेत असलेल्या रेती, माती आदी मालांचा वाहतूक परवाना नसणे, असे प्रकार वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन सुरू असतात. या बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या माध्यमातून वाहतूक पोलीस नाक्या-नाक्यावर तैनात केले आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा सुरु केला आहे. पाच दिवसांमध्ये एकूण एक हजार ५७९ वाहन चालकांविरोधात कारवाई केली. त्यांच्याकडून दहा लाख ५७ हजार ९५० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

ऑनलाईन कारवाईवर भर

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरोधात कारवाई करताना अनेक वेळा वाहतूक पोलिसांना त्यांचा पाठलाग करावा लागत होता. त्यामुळे वेळ मोठ्या प्रमाणात वाया जात होता. ही समस्या कायमची सोडविण्यासाठी ऑनलाईन कारवाईवर भर देण्यास सुरुवात केली आहे. बेशिस्त वाहन चालकांच्या गाडीचा मोबाईलवर फोटो काढून त्याला मेसेजद्वारे त्याची माहिती दिली जाते. त्यामुळे वाहतूक पोलिसांचा वेळही वाचण्यास मदत झाली आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड

। खोपोली । प्रतिनिधी ।

शिळफाटा इंदिरा चौकातील अरूंद रस्त्यावरून वाहनांची अत्यंत वर्दळ असते. दररोज होणाऱ्या वाहतुकीवर उपाययोजना करण्यासाठी खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी, प्रशासक अनुप दुरे आणि पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शिरीष पवार यांनी काही महिन्यांपूर्वी प्रत्यक्ष पाहणी करून इंदिरा चौकात बॅरिकेट्स लावून अवजड वाहतूक वळविल्यामुळे वाहतूक कोंडीला आळा बसविण्यात यश आले होते. मात्र चारचाकी, अवजड वाहने बिनधास्तपणे नो एंट्रीतून घुसत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक पोलिसांनी सकाळपासून अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई केल्याने वाहनचालकांचे धाबे दणाणले आहे.

शिळफाटा इंदिरा चौकातून पुण्याहून मुंबईकडे जाणारा तसेच शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या येथेन मुंबईकडे जाणाया एकेरी महामार्ग असला तरी दररोज सकाळी १ ते १२ आणि सायं. ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत वाहनांची अत्यंत वर्दळ असल्यामुळे शिळफाट्यावर वाहतूक कोंडी होते. यावर उपाययोजना करण्यासाठी मुख्याधिकारी, प्रशासक अनुप दुरे आणि पोलिस निरीक्षक शिरीष पवार यांनी काही महिन्यांपूर्वी प्रत्यक्ष पाहणी करून अवजड वाहतूक दुध डेअरी मार्गे खोपोलीच्या दिशेने वळविल्यामुळे वाहतूक कोंडीला आळा बसविण्यात यश आले होते. मात्र, वाहतूक पोलिसांची नजर चुकवून नो एंट्रीतून वाहने बिनधास्तपणे घेऊन जाणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई केली आहे.

वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

महामार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा, पोलिसांची दमछाक

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव शहरात सलग लागलेल्या सुट्ट्या त्यातच लगीनघाई आणि पर्यटकांची कोकणात उसळलेली गर्दी यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. त्यातच दरवर्षीप्रमाणे यंदाचे वर्षीही मोठ्या प्रमाणात एप्रिल व मे महिन्यात लग्न असल्याने अनेकांची लगीनघाई तर काहीची उन्हाळी सुट्टीसाठी लगबग त्यातच पर्यटकांची गर्दी यामुळे महामार्गावर तासन्तास प्रवाशांची राखडपट्टी होत आहे.

गेल्या महिन्यापासून सुट्ट्या शुक्रवार, शनिवार, रविवार तर कधी शनिवार, रविवार, सोमवार अशा आल्याने निसर्गाचे आकर्षण पर्यटकात वाढले असून, मुंबई, पुणे व इतर जिल्ह्यातून पर्यटक मोठ्या प्रमाणात कोकणात उसळले आहेत. त्यामुळे माणगाव शहरात वाहतूक कोंडीवर यांचा ताण पडत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीने गेले महिनाभरापासून माणगावकरांची डोकेदुखी कायम राहिली आहे.

कोकण भ्रमंती नंतर पर्यटकांचे लोंढे निघाले परतीला निघाले आहेत. महामार्गावर दोन्ही बाजूंनी चार, चार कि.मी रांगा लागल्या होत्या त्यामुळे पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. कोकणातून पर्यटक परतीच्या प्रवासाला निघाल्यामुळे वाहतूक कोंडीचा मात्र नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुंबई, पुणे व इतर जिल्ह्यातून पर्यटक मोठ्या प्रमाणात कोकणात आले होते.

माणगाव बाजारपेठेतील पुणे-निजामपूर-माणगाव रस्ता, मोर्बा मार्ग तसेच मुंबई-गोवा महामार्गावर प्रवासी पर्यटकांच्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. माणगाव बायपास रस्त्याचे काम थांबल्यामुळे वाहतूक कोंडीवर आणखीनच भर पडली आहे. मात्र, या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम जलद गतीने झाल्यास माणगाव बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा निकाली निघेल अशी पर्यटकातून चर्चा होत आहे.

रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे : ग्रामस्थांचा आरोप

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील अंत्राट वरेडी ते गुडवण आणि त्यापुढे लोभ्याची वाडी या रस्त्याचे सध्या सुरु असलेले डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे. रस्त्यावर टाकण्यात आलेले डांबर हाताने किंवा पायानेसुद्धा निघून जात आहे. दरम्यान, या नित्कृष्ट डांबरीकरण कामाची शासनाच्या भरारी पथकाने चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

नेरळ तळवडे पिंपळोली काळेवाडी अंत्राट वरेडी ते गुडवण आणि पुढे सुगवे फाटा आणि पुढे मुरबाड-कर्जत राष्ट्रीय महारमार्गाचा भाग वगळून हा रस्ता पुन्हा सुगाव

गाव ते पत्राची वाडी होऊन पुढे लोभेवाडी असा कशेळे-खांडस गणेश घाट रस्त्याला जाऊन मिळतो. या रस्त्यावर अंत्राट वरेडी-गुडवण-सुगवे फाटा ते लोभेवाडी असा रस्ता बनविला जात आहे. या रस्त्यावर कार्पेट डांबरीकरण पूर्ण झाले असून, ते कार्पेट डांबरीकरण होऊन जेमतेम तीन दिवस झाले आहेत. कार्पेट डांबरीकरणाचा थर हा स्थानिकांनी हाताने किंवा पायाने देखील निघून जातो असे निदर्शनास आणून दिले आहे. या प्रकाराबाबत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, ठेकेदाराने १२ मे रोजी पुन्हा एकदा रस्त्याच्या कडेच्या भागात रोलिंग करून घेतल्याचा आरोप ग्रामस्थ गोपाळ डायरे आणि मधुकर डायरे यांनी केला आहे.

> आता रस्ता झाला की पुन्हा दहा वर्षे रस्ता होण्याची शक्यता नाही. त्यामुळे अंत्राट वरेडी-गुडवण या रस्त्याच्या कामाची चौकशी करण्याची मागणी आम्ही करीत आहोत.
> - गोपाळ डायरे, ग्रामस्थ

> नव्याने केलेले कार्पेट डांबरीकरण गरम असल्याने ते सहज साध्या हाताने निघू शकते. मात्र, ग्रामस्थांनी कुठे कुठे रस्ता खराब झाला आहे याची माहिती दिल्यास ते काम आपण पुन्हा करून घेऊ. रस्ता अधिक टिकाऊ कसा होईल याकडे प्राधान्याने लक्ष देऊ.
> - संजीव वानखेडे, उपअभियंता, कर्जत सार्वजनिक बांधकाम विभाग

वडखळ-नागोठणे रस्ता खड्ड्यात

। हमरापूर । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था कायम असून, पेण-वडखळ व वडखळ-नागोठणेपर्यंत अनेक ठिकाणी खड्डेच खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमधून वाट काढताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे. याचा फटका प्रवासी, कामगार व विद्यार्थ्यांना बसत असून, त्यांचे अतोनात हाल होत आहेत.

वडखळ ते नागोठणे या रस्त्याची पुरती दैना झाली असून, जागोजागी खड्डे पडले आहेत. त्यातून वाट काढताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. वडखळपासून नागोठणेपर्यंत जाण्यासाठी किमान दीड तासांचा अवधी लागत आहे. त्यामुळे सर्वच जण बेजार झाले असून, जनतेत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, आता महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु झाले आहे. मात्र, वडखळ ते नागोठणेपासून पुढील रस्त्यावर खड्डेच पडले असून, या खड्ड्यांमधून गाडी चालवताना वाहन चालकाला बरीच कसरत करावी लागत आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सर्वपक्षीय राजकीय नेते व पदाधिकारी तसेच प्रशासनाने महामार्गाच्या या दुरवस्थेकडे लक्ष देण्याची मागणी जनतेतून होत आहे.

पान १ वरुन

शेकापतर्फे न्हावे येथे रुग्णवाहिकेचे लोकार्पण

■सभागृहाचे उद्घाटन करताना चित्रलेखा पाटील

तसेच शेकापच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या जय हनुमान मित्र मंडळ भायतांडेल आळी येथील सभागृहाचेदेखील यावेळी उद्घाटन करण्यात आले. दरम्यान, मोफत चष्मेवाटप कार्यक्रम पार पडला. त्याचा जवळपास ४०० लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

यावेळी चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, रुग्णवाहिकाचा पंचक्रोशीतील रुग्णांना फायदा होईल, वेळेवर रुग्णांना रुग्णालयात दाखल करणे सोयीस्कर होईल, तसेच जय हनुमान मित्र मंडळ सभागृहामार्फत तरुणाईला विविध सामाजिक उपक्रम राबविणे शक्य होईल. यावेळी मोफत नेत्रतपासणी करून चष्मेवाटपाचा लाभ ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील न्हावे, नवखार, सोनखार या गावातील ४०० लाभार्थ्यांनी घेतला. यावेळी हेमंत ठाकूर, नरेश यादव, नंदू मात्रे, संदेश विचारे, गोपीनाथ गंभे, शंकरराव म्हसकर, अमित देशपांडे, नेत्र चिकित्सक डॉ. अरविंद माटल, अशोक विचारे, राज जोशी, राजाभाऊ सानप, काशिनाथ भोईर, नारायण गायकर, राजश्री शाबासकर, विकास तांडेल, सदानंद पाटील, सुरेश पोसतांडेल, महादेव शाबासकर, विजय कासकर, विनायक कटोरे, हर्षली सर्लेकर, कमलाकर डबीर, किरण तांडेल, मंगेश पाटील, गोविंद तांडेल, विजय पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'न्याय भवन'ला न्याय कधी?

रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. नव्याने उभारलेल्या या इमारतीचा उद्घाटन सोहळा १५ ऑगस्ट २०१४ रोजी झाला. मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी तळमजल्यावर श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ही सहा कार्यालये, पहिल्या मजल्यावर समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, सभागृह व कर्मचाऱ्यांचे कार्यालय आणि दुसऱ्या मजल्यावर जात पडताळणी कार्यालय सुरु करण्यात आले. या इमारतीतून वंचित घटकांचा सर्वांगीण विकास होण्याची आशा पल्लवीत झाली होती. मात्र, उद्घाटन होऊन अवघ्या चार वर्षांतच इमारतीचा स्लॅब कोसळू लागला. भिंतींना तडे पडू लागले. पावसाळ्यात गळती होऊ लागली. अशा अनेक समस्यांमध्ये ही इमारत सापडू लागली.

इमारतीमध्ये काम करणारे कर्मचारी, कामानिमित्त येणारे विद्यार्थी, नागरिकांची सुरक्षा धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली. त्यामुळे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठाच्या तज्ज्ञ पथकाने २१९ मध्ये या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट केले. ही इमारत धोकादायक असल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आले. त्या जागी नव्याने इमारत बांधावी, अशी सूचना करण्यात आली. त्यानंतर पुन्हा इमारतीचे ऑडिट केले होते. त्यामध्ये दुरुस्त करून इमारत वापरू शकता, असा अहवाल दिला होता. या दोन वेगवेगळ्या अहवालांमध्ये तफावत असल्याने त्रयस्थ संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी समाजकल्याण विभागाकडून करण्यात आली. त्यानुसार मुंबई येथील एका संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी पुन्हा लाखो रुपये खर्च केले जाणार आहेत. सामाजिक न्याय भवन स्ट्रक्चरल ऑडिटच्या फेऱ्यात सापडल्याने या इमारतीच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया लांबणीवर जाण्याची शक्यता आहे.

सामाजिक न्याय भवनची कार्यालये विखुरली

गोंधळपाडा येथील सामाजिक न्याय भवन इमारतीमध्ये समाजकल्याण विभाग, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, विविध महामंडळाची कार्यालये होती. परंतु, इमारत धोकादायक ठरल्याने येथील कार्यालये अन्य ठिकाणी हलविण्यात आली. एकाच ठिकाणी असलेली कार्यालये विखुरल्याने मागासवर्गीय घटकांतील विद्यार्थ्यांसह समाजातील नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. कार्यालये शोधण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. निकृष्ट दर्जाच्या बांधकामाचा फटका या वंचित घटकाला झाल्याने नाराजीचे सूर उमटत आहेत. अनुसूचित जाती जमाती व इतर मागास प्रवर्ग विशेष मागास प्रवर्गातील घटकाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सामाजिक न्याय भवन बांधले. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे या जीर्ण इमारतीकडे दुर्लक्ष झाले आहे. या जीर्ण झालेल्या इमारतीच्या जागी तातडीने नवीन इमारत उभारावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष प्रदीप ओव्हाळ यांनी दिली.

भात गिरणीवर 'मविआ'ची सत्ता

मात्र, शेकापचे स्थानिक नेते नारायण डामसे, श्रीराम राणे, गजानन पेमारे, प्रकाश फराट, यशवंत जाधव, महेश म्हसे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद लाड, सीताराम मंडावले, बाळू थोरवे आणि शिवसेना ठाकरे गटाकडून ज्ञानेश्वर भालिवडे, रामदास घरत यांनी तानाजी मते पॅनलच्या प्रचाराची धुरा सांभाळली.

आज झालेल्या निवडणुकीत महिला मतदारसंघात तीन उमेदवारांची निवडणूक झाली. सकाळी आठ ते चार या वेळेत मतदान झाले आणि त्यानंतर मतमोजणी घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी शयाम कपोते यांनी ही प्रक्रिया यशस्वी पार पाडली. त्यावेळी २१७ मतदारांनी मतदान केले. त्यातील सात मते बाद झाली होती. या मतदारसंघात महाविकास आघाडीच्या तानाजी मते पॅनलमधील सुरेखा मते १३८, तर निर्मला पाटील ११२ मते मिळवून विजयी झाल्या आहेत, तर विरोधी पॅनलमधील विद्या घोडविंदे या पराभूत झाल्या आहेत. संस्था सर्वसाधारण मतदारसंघात सहा जागांसाठी निवडणूक झाली. तेथे महाविकास आघाडीच्या तानाजी मते पॅनलमधील सहा आणि विरोधी पॅनलमधील सहा असे बारा उमेदवार रिंगणात होते. या मतदारसंघात २१५ मतदारांनी मतदान केले. त्यातील नऊ मते बाद झाली असून, महाविकास आघाडीचे तानाजी मते- १३९, तुकाराम पाटील-१२२, जयवंत म्हसे- ११९, छगन थॉमब्रे-११६ आणि बाळू कानडे -११२ हे विजयी झाले तर विरोधी पक्षाचे जयराम हरपुडे हे ११० मते मिळवून विजयी झाले. या मतदारसंघात चिंधू बांगर, प्रकाश घोडविंदे, जनार्दन घुडे, अशोक पिंगळे हे सहा जण पराभूत झाले.

कुत्रा चावल्याने तरुणाचा मृत्यू

गेली दोंड ते दोन वर्षे रोहे शहारात मोकाट कुत्र्यांची दहशत आहे. हल्ल्यात असंख्य नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. कुत्र्यांकडून होणाऱ्या हल्ल्यासंदर्भात नगरपालिका प्रशासनाकडून उपाययोजना होत नसल्यामुळे जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली आहे.

महिला अत्याचार प्रकरणाला वेगळे वळण

(२) (एन) ३५४, ३२३, ५०४, ५०६, ३४ या प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. परंतु, अद्याप कुणीही आरोपी अटक नाही. परंतु, फिर्यादी महिलेच्या पतीविरुद्ध या गुन्ह्यातील आरोपीने पेण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. यामध्ये अमर याने अशी माहिती दिली आहे की, पीडित महिलेचा पती सुजीत याने घरात घुसून शिवीगाळ केली व लोखंडी कोयत्याने डोक्यात वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो वार चुकल्याने तो खांद्यावर लागला. यामध्ये आपापसात धक्काबुक्की झाली. वरील हकीकतीच्या आधारे पेण पोलीस ठाण्यात भा.दं.वि.स.क. ३०७, ४५२, ३२३,५०४, ३४ नुसार गुन्हा नोंद झाला असून, यातील आरोपी सुजीत पाटील यास अटक झाली आहे. सदर दोन्ही गुन्ह्यातील तपास पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

बॅनरबाजी रोखण्यात अपयश

आपापल्या राजकीय पक्षाचे जाहिरात फलक लावून हे राजकीय पक्ष पालिकेच्या नियमाचे उल्लंघन करत आहेत. पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून विनापरवानगी लावण्यात येणाऱ्या बॅनरवर कारवाई करण्यात येत असते. मात्र, राजकीय पक्षाच्या बॅनरवर कारवाई करताना राजकीय नेते दबाव आणत असल्याने अतिक्रमण विभागातील कर्मचारी हतबल ठरत असल्याची माहिती अतिक्रमण विभागातील एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे.

उन्हाळी सुट्टीत किनारे फुलू लागले

उन्हाचे चटके जाणवू लागले. उष्माघाताचा धोका निर्माण झाला. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ नये यासाठी परीक्षा झाल्यावर विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर केली. परंतु, विद्यार्थ्यांना दोन मे रोजी होणाऱ्या निकालाकडे डोळे लागले होते. निकाल जाहीर झाल्यानंतर उन्हाळी सुट्टी सुरु झाली. उन्हाळी सुट्टी कुठे घालवायची याचे नियोजन गेल्या अनेक दिवसांपासून पर्यटकांनी केले होते. परंतु, राज्यात तापमान वाढत असल्याने फिरायला कुठे जायचे, असा प्रश्न पर्यटाकांसमोर उभा होता. मुंबईत तर उष्णतेने कहर केली. दुपारच्यावेळी घरातून बाहेर पडणेदेखील नकोसे झाले. त्यामुळे उन्हाळी सुट्टी रायगड जिल्ह्यात घालविण्याचा निर्णय मुंबईसह पुणे व अन्य जिल्ह्यातील पर्यटकांनी घेतला आहे. गेल्या दहा दिवसांपासून दररोज हजारो पर्यटक रायगड जिल्ह्यात येऊ लागले आहेत. काही जण दोन दिवस, तर काही जण आठ दिवस येऊन सुट्टीचा आनंद लुटत आहेत. शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी तर पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. उन्हाळी सुट्टी घालविण्यासाठी अलिबाग, नागाव, वरसोली, किहीम, काशीद, मुरुड, श्रीवर्धन, दिवेआगर येथील समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी वाढत आहे. किनाऱ्यावर असलेली पॅरास्लायडींग, बनाना अशा अनेक सागरी खेळाबरोबरच बोटींग, घोडागाडी, एटीव्ही बाईक, सायकलमधून सवारी करीत पर्यटक आनंद लुटत आहेत. उन्हाळी वातावरण असल्याने जास्तीत जास्त पर्यटक समुद्रात व स्विमींग पुलमध्ये पोहण्याचा आनंद घेण्यामध्ये अधिक पसंती दर्शवित आहेत. उन्हाचे चटके लागत असल्याने पर्यटक जास्तीत जास्त वेळ समुद्रकिनाऱ्यांवर घालवत आहेत. समुद्रकिनारी असलेली हॉटेल्स, कॉटेजेस, रिसॉर्टमध्ये पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. काही पर्यटक उन्हापासून बचाव करण्यासाठी हॉटेल, कॉटेजेसमध्ये बंद खोलीत एसी अथवा पंख्यामधून गारवा शोधत आहेत. त्यामुळे हॉटेल, कॉटेजेस फुल्ल असल्याचे व्यावसायिकांकडून सांगण्यात आले आहे.

पूर्ववैमनस्यातून तिघांवर चाकूहल्ला

दिपेश दीपक पवार (२५) सर्व रा. चांढवे बौद्धवाडी यांच्यावर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यातील जखमी उणीत जाधवची प्रकृती गंभीर असल्याने त्याला महाड ग्रामीण रुग्णालय येथे प्रथमोपचार करून मुंबई येथे हलविण्यात आले आहे, तर विकास जाधव व दिपेश पवार या दोन तरुणांवर महाड ग्रामीण रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. यामध्ये आरोपी प्रथम संतोष सकपाळ, संकेत संतोष सोनवणे, सनी भागुराम सकपाळ, प्रथमेश बायज्या सकपाळ, विकी भीमराव सकपाळ, सुजित सुनील सकपाळ, सुजल भागुराम सकपाळ, सनी महेंद्र सोनवणे अशा आठ जणांविरोधात हाफ मर्डरचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मारुती आंधळे हे करीत आहेत.

एकत्र निवडणुका लढविण्यावर एकमत

या निवडणूक निकालाचे विश्लेषण करण्यात आले. सुप्रीम कोर्टाच्या निकालाबाबत चर्चा करण्यात आली. या निकालानंतर त्यापुढील वाटचाल याबाबत चर्चा करण्यात आली असल्याचे पाटील यांनी सांगितले. उन्हाळा कमी झाल्यानंतर पाऊसमान पाहून सभा सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. उन्हाची तीव्रता कमी झाल्यानंतर मविआची वज्रमूठ सभा सुरू होणार असल्याचे त्यांनी म्हटले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले की, कर्नाटकच्या जनतेमध्ये भाजप विरोधात रोष होता तो मतपेटीतून व्यक्त झाला आहे. कर्नाटकमधील जनतेने मोदी-शाह यांच्यावरचा राग काढला आहे. महाविकास आघाडीची वज्रमूठ सभा पुन्हा एकदा सुरू होणार आहेत. पुढील सभा पुण्यात होणार असून, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचा सत्कार पुण्यातील सभेत करणार असल्याचे त्यांनी म्हटले. शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले की, मविआत कोणतेही मतभेद नाहीत. कर्नाटकमध्ये काँग्रेसचे नव्हे तर देशातील विरोधी पक्ष जिंकला आहे. महाराष्ट्रावरही त्याचा परिणाम होणार आहे. महाराष्ट्रातही भाजपचा पराभव होणार आहे. जसं कर्नाटकात जिंकलो, त्याची पुनरावृत्ती महाराष्ट्रात होणार आहे. मविआमध्ये जागा वाटप होणार. त्याची चिंता इतरांनी करू नये, असेही राऊत म्हणाले.

नि व ड क

बंद कारखान्यात चोरी

महाड : औद्योगिक क्षेत्रातील बंद असलेल्या पर्ल पॉलिमर कारखान्यातून ६८ हजार रुपये किमतीच्या साहित्याची चोरी झाल्याची तक्रार एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ९ ते १० मे दरम्यान झालेल्या या चोरीप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आसनपोई गावाजवळ बंद असलेल्या पर्ल पॉलिमर कारखान्यातील पाण्याच्या जारचे लोखंडी साचे तसेच अन्य लोखंडी साचे चोरट्याने लंपास केले. या सर्व साहित्याची एकूण किंमत ६८ हजार रुपये इतकी आहे.

उसाच्या रसाला मागणी

पनवेल : सध्या तापमानाचा पारा पुन्हा वाढू लागला आहे. त्यामुळे उन्हाने हैराण झालेले नागरिक कोरड पडलेल्या घशाला थंडावा देण्यासाठी शीतपेय म्हणून उसाच्या रसाला सर्वाधिक पसंती देत आहेत. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने मोठ्या प्रमाणात तहान लागते. ही तहान भागवण्यासाठी अत्यंत माफक दरात उपलब्ध असलेल्या उसाच्या रसाला नागरिक मोठ्या प्रमाणात पसंती देत आहेत. उसाचा रस हा लहान ग्लास १० रुपये, मध्यम ग्लास २० आणि मोठा ग्लास २५ रुपये अशा किमतीत उपलब्ध आहे.

ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

नवी मुंबई : इन्कम टॅक्सचा फॉर्म ऑनलाईन भरण्याच्या प्रयत्नात असलेल्या ७४ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला एका सायबर चोरट्याने बँकेच्या कस्टमर केअरचा प्रतिनिधी असल्याचे भासवून दोन लाख रुपयांना लुबाडले. सीबीडी पोलिसांनी या प्रकणातील अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

जेएनपीएत ई-सिगारेटची तस्करी

उरण : जेएनपीए बंदरातून बनावट वस्तूच्या नावाखाली तस्करी करण्यात आलेली ३ कोटींची ई सिगारेट सीमा शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत जप्त केली आहेत. ४० फुटी कंटेनरने पाठविण्यात आलेला ४५ हजार ८८६ ई-सिगारेटचा साठा जेएनपीए सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून ताब्यात घेतल्या आहेत. या ई-सिगारेटच्या साठ्याची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तीन कोटी आहे. सीमा शुल्क विभागाला गुप्त खबऱ्याकडून मिळालेल्या माहीती वरून विदेशातून तस्करीच्या मार्गाने पाठविण्यात येणाऱ्या ई-सिगारेटची माहिती मिळाली होती.

खोपोलीत काँग्रेसचा जल्लोष

खोपोली : कर्नाटक राज्यात काँग्रेसचा धमाकेदार विजयाचा आनंद देशभरातील काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी राहुल गांधी जिंदाबाद, संविधान जिंदाबाद, लोकशाही जिंदाबाद अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित नागरिकांना पेढे भरवून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन, महिला अध्यक्ष रेखा जाधव, प्रवीण क्षीरसागर, ॲड. संदेश धावरे, बंधू चौधरी यांच्यासह शहर काँग्रेस, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस मोठ्या प्रमाणावर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पालीत नालेसफाई प्रलंबित

नाले गटारे तुंबली, जनतेसह भाविक बेजार, दुर्गंधीचे साम्राज्य

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

पावसाळा अगदी तोंडावर आला आहे. अशा परिस्थितीत अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीमध्ये नालेसफाईला अजून सुरुवात झालेली नाही. परिणामी पावसाळ्यात नाले तुंबल्याने पुरस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे.

पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबले आहेत. या तुंबलेल्या गटारांमुळे सर्वत्र घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरते. या त्रासामुळे जनतेसह भाविकही बेजार झाले आहेत. येथील एसटी बस स्थानकासमोरील मोठा नाला, भोई आळी, आगर आळी, राम आळी, खडक आळी, कुंभार आळी, मधली आळी, सोनार आळी, कासार आळी, बल्लाळेश्वर नगर, कासार आळी व बल्लाळेश्वर मंदिराच्या भोवतालच्या परिसरातील नाले सफाईची कामे बाकी आहेत. साठलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात घाण व दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. नालेसफाई झाली नसल्यामुळे नागरीक संताप व्यक्त करत आहेत. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही या घाणीचा व दुर्गंधीचा त्रास होत आहे. पावसाळ्यात तर या तुंबलेल्या नाल्याचे व गटाराचे पाणी रस्त्यावर येऊन पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होते. तसेच रोगराईला आमंत्रण मिळते. त्यामुळे वेळीच नालेसफाई करण्याची मागणी पालीकर करत आहेत.

> पावसाळा तोंडावर आला आहे. नालेसफाई व औषध फवारणीची कामे वेळेत होणे आवश्यक आहे. अन्यथा नाले तुंबून पावसाळ्यात पुरस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे. नाले सफाई व स्वच्छतेच्या संदर्भात लवकर उपाययोजना करावी. नागरिकांनी प्लास्टिक बॉटल, पिशव्या व घरातील कचरा गटारे किंवा नाल्यात टाकू नये.
>
> –अमित निंबाळकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, पाली

> नालेसफाई संदर्भात गुरुवारी (ता.११) बैठक घेण्यात आली. पावसाळ्याआधी योग्यप्रकारे पूर्ण केली जाईल. यासाठी आवश्यक नियोजन, साधने व निधीची तरतूद करण्यात आली आहे.
>
> –प्रणाली सूरज शेळके, नगराध्यक्षा, पाली नगरपंचायत

नाले-गटारांची दुरावस्था

अनेक नाले व गटारांची दुरुस्ती झालेली नाही. नाले व गटारे मोडकळीस आलेले आहेत. काही नाल्यांमध्ये तर झाडे आणि गवत उगवले आहे. तर काही नाले, गटारे गाळ व मातीने भरली आहेत.

कामोठेत पुन्हा हुक्क्याचा धूर

|| पनवेल पोलिसांची कारवाई

|| पार्लरमध्ये पुन्हा तरुणाईची गर्दी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कामोठे वसाहती मधील हुक्का पार्लरमध्ये घडलेल्या हाणामारीच्या घटनेनंतर बंद झालेले हुक्का पार्लर पुन्हा सुरु झाल्याचे पाहायला मिळत आहे. रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी मोठ्या संख्येने तरुण तरुणीची गर्दी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. कामोठे वसाहतीमधील वेंकट प्रेसिडंसी हॉटेलच्या टेरेसवर सुरु असलेल्या एका हुक्का पार्लरमध्ये हाणामारीची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. या हाणामारीत एक तरुण गंभीर जखमी झाल्याची बाब यावेळी पुढे आली होती.

कामोठे पोलीस ठाण्यात या प्रकरणी दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत हाणामारीत घडलेल्या हुक्का पार्लरमधील साहित्य जप्तीचे काम पोलिसांनी केले होते. त्याचप्रमाणे हुक्का पार्लर चालवणारा मालक, व्यवस्थापक तसेच दोन ग्राहकांवर देखील पोलिसांनी कारवाई केली होती. पोलिसांनी केलेल्या कारवाईचा धसका घेत वसाहतीत सुरु असलेले इतर हुक्का पार्लर देखील काही दिवसांकरता बंद करण्यात आल्याचे पाहायला मिळाले होते. आता मात्र बंद असलेले हे हुक्का पार्लर पुन्हा सुरु झाले असून, वसाहतीमधील सेक्टर २१ मधील टुडे शिवम या भूखंड क्रमांक १३ तसेच सेक्टर १४ मधील भूखंड क्रमांक १०६ वर सुरु असलेल्या हुक्का पार्लरमध्ये हुक्क्याचा धूर सोडण्यासाठी तरुणाई पुन्हा गर्दी करू लागल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

हुक्का पार्लर कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी

हुक्का पार्लर च्या नादाने तरुणाई नशेच्या आहारी जात असल्याने वसाहतीमधील हुक्का पार्लर कायम स्वरूपी बंद करा अशी मागणी आगरी, कोळी, कराडी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेच्या वतीने तसे पत्र पोलीस आयुक्तांना देण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

कोणथरेतील स्त्रिया होणार सामाजिक बंधनातून मुक्त

। तळा । वार्ताहर ।

तालुक्यातील मौजे कोणथरे गावाने स्त्रियांच्या बाबतीत ऐतिहासिक निर्णय घेतला असून गावातील विधवा स्त्रियांना जाचक सामाजिक बंधने व रुढीतून मुक्त करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे.

श्री काळभैरव उत्सवानिमित्त ग्रामविकास मंडळ कोणथरे, मुंबईकर मंडळ कोणथरे, ग्रामस्थ मंडळ कोणथरे व महिला मंडळ कोणथरे यांची संयुक्त वार्षिक सर्वसाधारण सभा काळभैरव मंदिर सभागृहात संपन्न झाली. सामाजिक सुधारणांचा ध्यास घेतलेल्या तळा तालुक्यातील या लहानशा खेड्यात सामाजिक कार्यातील विधवांचे स्थान सौभाग्यवतींप्रमाणे संपन्न असावे आणि खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता जोपासली जावी यासाठी विधवा प्रथेच्या अनुषंगाने निर्माण झालेले गैरसमज, जाचक रूढी बंद करण्याचा क्रांतिकारी व धाडसी निर्णय एकमताने घेण्यात आला. त्यामुळे विधवा स्त्रीचे जीवन अधिक स्वायत्त व सुंदर होण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष लिलाधर बाईत, मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष प्रकाश बाईत, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष किसन बाईत व महिला मंडळाच्या अध्यक्षा हर्षाली आडीत तसेच गावातील ज्येष्ठ सभासद साधुराम पिंपळे, चंद्रकांत कोतवाल उपस्थित होते. उत्तम परंपरांचे वहन आणि समाजविघातक प्रथांचे उच्चाटन याकरिता कोणथरे गाव नेहमीच उत्तम कार्य करीत आहे. त्यामुळे तालुक्यात सर्व स्तरांतून कोणथरे गावचे कौतुक होत आहे.

महाड क्रांतीभूमीत मटका सुरूच

नागरिकांच्या तक्रारीला पोलीस प्रशासनाकडून केराची टोपली

। महाड । प्रतिनिधी ।

महाडच्या क्रांतीभूमीत गेल्या कांही दिवसांपासून बेकायदेशीर मटका आणि ऑनलाईन लॉटरी व्यवसाय तेजीत आहे. हे बेकायदेशीर उद्योग किरकोळ कारवाईनंतर पुन्हा सुरू केले जातात. पोलिसांचे पूर्ण अभय असल्याने दिवसेंदिवस ही संख्या वाढत चालली आहे. याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या मात्र या तक्रारींना महाड शहर पोलीस निरीक्षकांनी केराची टोपली दाखवली आहे. पोलीस अधीक्षक देखील याबाबत गप्प असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

महाड शहर हे छ.शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. राजकीय, सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रातील दिग्गज या महाड क्रांतीभूमीने दिले आहेत. महाडमध्ये वीरेश्वर महाराजांचा छबिना उत्सव देखील प्रसिद्ध आहे. तर ऐतिहासिक चवदारतळे येथे प्रतिवर्षी लाखो भीम अनुयायी महामानवाला अभिवान करण्यासाठी येत असतात.

शहरातील छ.शिवाजी चौक परिसराला देखील या व्यवसायाने वेढले आहे. त्याचप्रमाणे शहरातील प्रमुख रस्ते, नातेखिंड, महामार्ग याठिकाणी टपऱ्यांमधून मटका दुकाने खुलेआम सुरु झाली आहेत. ग्रामीण भागातील जनता, आदिवासी, तरुण मुले झटपट पैसा मिळवण्याच्या हेतूने मटका आणि ऑनलाईन लॉटरीकडे वळत आहेत. यातून व्यसनाधीनता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पोटाची भूक भागवण्यासाठी धडपड करत असलेले आदिवासी या मटका दुकानांचे बळी ठरत आहेत. दिवसभर मेहनत करून कमावणारे आपले पैसे मटक्यावर उधळत असल्याने अनेकांचे संसार धोक्यात आले आहेत. हे अनधिकृत व्यवसाय हद्दपार होण्यासाठी पोलीस प्रशासनाने याबाबत कडक कारवाई करणे आवश्यक आहे. या मटका व्यवसायाबाबत एका राजकीय लोकप्रतिनिधीने देखील तक्रार केली होती.

शिवराज्याभिषेकदिनाची जय्यत तयारी

। महाड । वार्ताहर ।

रायगड किल्ल्यावर दोन जूनला तिथीनुसार तर सहा जूनला तारखेनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा होत आहे. यंदा शिवराज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष असल्याने मोठ्या संख्येने शिवप्रेमी किल्ल्यावर दाखल होणार आहेत. सोहळ्याला कोणतेही गालबोट लागू नये, याकरिता प्रशासन सज्ज झाले असून अधिकाऱ्यांनी रायगड गडावरील तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी केली.

शिवप्रेमींसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, वाहनतळ, रायगडावर येण्यासाठी एसटी वाहतुकीबाबत नियोजन, स्वच्छतागृहे, रायगड रोप वे, गडावरील सुरळीत वीज पुरवठा, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस सुरक्षा व्यवस्था अशा विषयांचा यावेळी आढावा घेण्यात आला. अधिकारी वर्गाने गडावर जाऊन तयारीचा आढावा घेतला. आढावा बैठकीला जिल्हाधिकारी योगेश म्हस्के, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतुल झेंडे, सर्जेराव मस्के पाटील, महाडच्या प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार सुरेश काशीद तसेच शिवराज्याभिषेक समिती व कोकणकडा मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

कोंदिवडे पूल धोकादायक स्थितीत

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील कोंदिवडे गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर असलेला उल निकामी झाला आहे. त्या पुलाची सार्वजनिक बांधकाम खात्याने आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दुरुस्ती केलेली नाही. दरम्यान, या पुलाची तात्पुरती दुरुस्ती करण्याची गरज असून त्या ठिकाणी नवीन पुलाची निर्मिती करण्याची देखील गरज निर्माण झाली आहे.

तालुक्यातील चिंचवली-उकरूल- कडाव- तांबस- जांभिवली- वेणगाव-दहिवली-कोंदिवडे या राज्य मार्ग रस्त्यावर कोंदिवडे गावाच्या अलिकडे ३० फूट उंचीचा लहान पूल आहे. हा पूल अनेक वर्षे शासनाच्या कोणत्याही यंत्रणेकडून दुरुस्त करण्यात आला नाही. या रस्त्यावर सध्या मोठ्या प्रमाणात आर्थिक निधी खर्च केला जात आहे. खांडपे आणि कोंडीवडे गावाच्या मध्ये हा पूल आहे. २५ फूट लांबीचा हा पूल बांधून ४० वर्षाचा काळ लोटला आहे.मात्र पुलाची बांधणी केल्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभाग या पुलाची दुरुस्ती केलेली नाही. त्यामुळे पूल धोकादायक बनला असून या पुलाच्या कठड्याला एखादे वाहने जरी धडकले तरी ते वाहन खाली कोसळून मोठा अपघात होऊ शकतो.

त्याचवेळी एखादे वाहन रात्रीच्या अंधारात पुलाखाली तर पुलाच्या उंचीमुळे बाहेर काढण्यात आहेत. दुसरीकडे हा पूल अपघातग्रस्त होऊन बंद पडल्यास वाहतुकीसाठी कोंदिवडे, चोची, कोंढाणे तसेच मुंढेवाडी या गावांमधील वाहनचालक यांना अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाच्या ठिकाणी नवीन पूल बांधण्यासाठी चाचपणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मोऱ्यांच्या दुरुस्तीसाठी रस्ता बंद

। उरण । वार्ताहर ।

उरण-पनवेल मार्गावरील नादुरुस्त मोऱ्यांच्या दुरुस्तीसाठी शनिवारपासून बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण रेल्वे स्टेशन मार्ग अखेर वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे उरण शहरातून व शहरा बाहेरून ये-जा करण्यासाठी प्रवाशांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याची सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे.

उरण - पनवेल मार्गावरील बोकडविरा पोलीस चौकी ते कोटनाका (आनंदी हॉटेल) दरम्यानच्या दोन मोऱ्या नादुरुस्त झाल्या आहेत. त्यांची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे. मात्र मोऱ्यांच्या दुरुस्तीसाठी मार्ग बंदी आणि पर्यायी मार्गाची अधिसूचना नवी मुंबई वाहतूक विभागाकडून प्रलंबित होती. त्यामुळे मार्च महिन्यापासून या कामाची प्रतिक्षा होती. ही अधिसूचना वाहतूक विभागाने जाहीर केली असल्याने या कामाला सुरुवात झाली आहे.

सध्या उरण रेल्वे स्टेशन जवळील मोरी तोडून त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या मार्ग मोऱ्याचे काम पूर्ण होई पर्यंत बंद राहणार आहे. पर्यायी मार्ग : उरण-पनवेल मार्गावरील बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण रेल्वे स्टेशन हा मार्ग बंद केला आहे. त्यामुळे उरण शहरात ये-जा करणाऱ्या प्रवाशांनी बोकडविरा येथून उड्डाणपूल मार्गे शेवा ते चारफाटा प्रवास करावा लागणार आहे.

ग्रामीण भागासह शहरी भागातही होतोय बदल

। अलिबाग । प्रतिनिधी । मोबाईल, क्रिकेटमध्ये रमणारी तरुणाई आता भजन किर्तनामध्ये ही रमू लागले आहेत. गावागावात दहावर्षापासून ते ४० वयोगटातील तरुणाई वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये भजन किर्तन करीत असल्याचे पहायला मिळत आहे.ग्रामीण भागासह शहरी भागात आजही भजन किर्तनाला फार महत्व आहे. गावांमध्ये उत्सव यात्रांसह वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये भजन कीर्तन मोठ्या प्रमाणात घेतले जात आहेत.

तरुणाई रमली भजनांमध्ये

पुर्वी भजन कीर्तनामध्ये ५० वर्षापुढील वयोगटातील मंडळींचा सहभाग जास्त होता. त्यामुळे विशिष्ट वयोगटातील मंडळी या भजन कीर्तनामध्ये सहभाग होत होती. परंतू बदलत्या काळानुसार, भजन कीर्तनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलू लागला आहे. वयाच्या तीन वर्षापासून अनेक मुलांना पालक ताल मृदूंगाचे धडे घेण्यासाठी प्रोत्साहीत करीत आहेत. मोबाईलमधील कॅन्डी क्रश सारख्या खेळांसह क्रिकेट, कबड्डी या खेळाकडे रमणारी तरुणाई आता भजनाकडे आकर्षित होऊ लागली आहे. वेगवेगळ्या संस्था संघटनांमध्ये भजनांच्या स्पर्धा घेतल्या जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे भजनांपासून दुर राहणाऱ्या पिढीला भजनाबाबत आकर्षण दिवसेंदिवस वाढू लागले आहे. ग्रामीण भागासह शहरी भागातही याचा बदल दिसून येत आहे.

> गेल्या ३५ वर्षापासून भजन गायनाचे काम करीत आहे. पुर्वी ५० पेक्षा अधिक वयोगटातील मंडळी भजनात असायची. परंतू गेल्या दहा वर्षापासून तरुण मंडळीदेखील भजनामध्ये रमू लागली आहे. भजनातील संगीताची आवड तरुणांमध्ये निर्माण झाली आहे. गायनाची आवड वाढली आहे.
>
> - हरिराम पारंगे - बुवा, श्रीगजानन प्रासादिक भजन मंडळ

> गेल्या पंधरा वर्षापासून भजनाला सुरुवात केली. लहानपणापासून गायनाची आवड होती. हार्मोनिअमचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर गावागावात भजन करू लागलो. दर मंगळवारी सराव ठेवला. पुर्वी विशिष्ट वयोगटातील मंडळी भजनात असायची. आज माझ्याच वयातील मंडळी भजनात असल्याचा आनंद आहे.
>
> - मनोहर भोईलकर आंबेपुर, कुंभारआळी

वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये भजनात त्यांचा सहभाग प्रचंड वाढू लागला आहे. गावांमधील प्रासादिक भजन मंडळात गायन करण्यापासून ताल मृदूंग वाजण्यापासून सहगायक म्हणून भुमिका बजविण्याचे काम तरुणाई करू लागली आहे.

दुचाकीस्वाराला वाचवताना अपघात

। वावोशी । वार्ताहर ।

साजगाव फाट्यावर रविवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास एका दुचाकीस्वाराच्या चुकीमुळे खोपोली खरीवली एस टी बसचा अपघात झाला. परंतू एसटी बस चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे बसमधील ३७ प्रवासी सुखरूप बचावले आहेत. एम एच ०७ सी ७१८८ क्रमांक असणारी खोपोली खरीवली एसटी बस ही पेणच्या दिशेने जात असताना साजगाव फाट्यावरील एनपी ढाब्यावर आली असता समोरून एक दुचाकीस्वार खोपोलीच्या दिशेने एका वाहनाला भरधाव वेगाने ओव्हरटेक करून जात असताना त्या दुचाकीस्वाराचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने तो थेट बसवर येऊन आदळणार त्याच क्षणाला चालकाने प्रसंगावधानता राखत बस रस्त्याच्या बाजूला उतरवून त्या दुचाकीस्वाराचे व बसमधील ३७ प्रवाशांचे प्राण वाचविले.

यावेळी बस खाली रस्त्याच्या बाजूला घेताना पलटी होता होता थोडक्यात बचावल्याने सर्व प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला. एस टी चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे मात्र फार मोठा अपघात घडताना राहिला. दुचाकीस्वाराची चुकी असल्याने दुचाकीस्वाराने आपली एम एच ४६ सी जी ७३३७ क्रमांकाची होंडा क्टिवा कंपनीची स्कूटी रस्त्यावर सोडूनच फरार झाला. या अपघाताची वार्ता समजताच त्या ठिकाणी सनी पाटील, मयूर पाटील, रमेश पाटील यांनी प्रवाशांना बाहेर काढले व त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली.

जनता सज्ज आहे...

कर्नाटकात भाजपला जबरदस्त दणका बसला आहे. गेल्या वेळच्या निवडणुकांनंतर राज्यात काँग्रेस आणि देवेगौडांचे जनता दल यांचे संयुक्त सरकार आले होते. पण भाजपने फोडाफोडी करून आमदार पळवले आणि पुढची चार वर्षे तो पक्ष सत्तेत राहिला. इतके करूनही त्याला आपल्या राज्यकारभाराची छाप पाडता आली नाही. तेव्हा हिजाब आणि बजरंगबलीसारखे मुद्दे घेऊन हिंदू विरुध्द मुस्लिम अशी तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न त्याने केला. हे प्रयत्न करणाऱ्यांना कानडी जनतेने सणसणीत श्रीमुखात वाजवली आहे. काल बंगालमध्ये ममतांची तृणमूल होती. आज कर्नाटकात काँग्रेस आहे. एकूणच भाजपच्या विरोधात उभ्या राहणाऱ्या ज्या शक्ती आणि पक्षांविषयी भरवसा वाटेल त्यांना जनता योग्य वेळ येताच पूर्ण समर्थन द्यायला तयार असते हे दिसून आले आहे. भाजपला विरोध करायला जनता तयार आहे, आता देशातील नेते व राजकीय पक्षांनी तिच्यासोबत उभे राहायला हवे हाच या निकालांचा बोध आहे. आज विजय मिळवलेल्या काँग्रेसमध्ये उद्या कदाचित भांडणे सुरू होतील, मुख्यमंत्रिपदावरून तणातणी होईल, आणखी काही महिन्यांनी भाजप कदाचित हेही सरकार पाडण्याचा प्रयत्न करील. कारण, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी जास्तीत जास्त राज्य सरकारे आपल्या बाजूला आहेत हे दाखवायचे असेल. पण भविष्यात असे झाले तरीही तेरा मे २०२३ रोजी जनतेने दिलेला संदेश नष्ट होऊ शकणार नाही. भाजपने कितीही पैसे ओतले आणि लोकांच्या मनात धर्माचे विष कालवण्याचा कितीही प्रयत्न केला तरीही या देशातील जनतेला मूर्ख बनवता येणार नाही हा तो संदेश आहे. ही जनता योग्य वेळ येताच आपले मत मतपेटीद्वारे व्यक्त करतेच असाही त्याचा अर्थ आहे. दिवसरात्र वृत्तवाहिन्या आणि सोशल मिडियामधून प्रचार केल्यामुळे जिकडेतिकडे सर्वत्र भाजपचे भक्त असल्याचे चित्र निर्माण झाले तरी ते पूर्णपणे फसवे असते हेही या निकालामुळे स्पष्टपणे दिसले आहे.

मोदी-शहांचा पराभव

नेहमीप्रमाणे भाजपने आपल्या भात्यातील सर्व अस्त्रे या निवडणुकीत वापरली. गृहमंत्री अमित शाह गेल्या सहा महिन्यांपासून विविध निमित्ताने येथे येत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही तीन-चार वेळा भेटी दिल्या. शेवटच्या टप्प्यात वीस सभा घेतल्या. गेल्या ७५ वर्षात देशाच्या पंतप्रधानाने एखाद्या राज्याच्या विधानसभेसाठी इतका प्रचार करण्याची ही पहिलीच वेळ असावी. बंगळुरूसारख्या जगप्रसिध्द आयटी कंपन्याची मुख्यालये असणाऱ्या शहरातल्या लोकांची कित्येक तास अडवणूक करून मोदींनी एक रोड शो केला. त्याची सर्व वृत्तवाहिन्यांनी प्रचंड जाहिरात केली. काँग्रेसने मला आजवर ९१ शिव्या दिल्या असा हास्यास्पद आरोप मोदींनी केला. बजरंग दलासारख्या संघटनांवर बंदी घालू असे आश्वासन काँग्रेसने दिल्यावर हनुमानाचा अपमान झाल्याचा कांगावा मोदींनी सुरू केला. मतदान करताना जय बजरंगबली म्हणा अशी बाष्कळ चिथावणी देऊन झाली. काँग्रेसने आजवर लिंगायत समाजावर अन्याय केल्याची आवई उठवण्यात आली. पण इतका सर्व विषारी आणि खोटा प्रचार भाजपला तारू शकला नाही. किंबहुना, जनतेला या सर्वांचा उबग आला असावा. त्यामुळेच आज काँग्रेसला भाजपच्या दुपटीहून अधिक जागा मिळाल्या आहेत. मुंबई कर्नाटक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रालगतच्या बेळगाव, कारवार, हुबळी, धारवाड, मंगलोर, उडीपी इत्यादी भागात भाजप प्रचार न करतादेखील निवडून येऊ शकतो असे म्हटले जात असे. पण तिथेच या पक्षाला मोठा फटका बसला. हा उत्तरेचा तसेच मध्य कर्नाटकाचा भाग हा लिंगायत समाजाचा बालेकिल्ला. काँग्रेसकडे येडियुरप्पांसारखा नेता नसूनही या भागात त्यांनी मोठे यश मिळवले. म्हैसूर कर्नाटकामध्ये देवेगौडांच्या वोक्कलिग समाजाचा प्रभाव आहे. पण तिथेही काँग्रेसने मुसंडी मारून जनता दलाच्या जागा आपल्याकडे खेचून घेतल्या. अगदी बंगळुरूसारख्या शहरी भागातही काँग्रेसने भाजपच्या तोडीस तोड यश मिळवले. मुस्लिम समाजही काँग्रेसच्या मागे उभा राहिला. थोडक्यात समाजाच्या सर्व थरातून काँग्रेसला पाठिंबा मिळालेला आहे.

मोकळा श्वास

दक्षिण भारतात शिरकाव करण्याचे प्रवेशद्वार म्हणून भाजप कर्नाटकाकडे पाहत असतो. पण कर्नाटक म्हणजे मागास उत्तर प्रदेश नव्हे हे आता त्याला कळले असेल. हिजाबपासून केरळ स्टोरीपर्यंत सतत मुस्लिमद्वेषाचे राजकारण करून आपल्याला लोक मते देतील हा भाजपचा भ्रम आता तरी दूर व्हावा. वाढती महागाई, बेरोजगारी हे प्रश्न लोकांना महत्वाचे वाटत असल्याचे विविध सर्वेक्षणांमध्ये दिसले होते. याबाबत भाजपकडे काहीही उत्तरे नव्हती. सर्वात निर्णायक ठरला तो भ्रष्टाचाराचा मुद्दा. भाजपच्या नेत्यांना प्रत्येक कामात चाळीस टक्के दलाली द्यावी लागते असा जाहीर आरोप कंत्राटदारांच्या संघटनेने गेल्या वर्षी केला होता. बेळगावच्या एका कंत्राटदाराने यापायी आत्महत्याही केली. तरीही यात फरक झाला नाही. भाजप नेत्यांची मस्ती इतकी, की काँग्रेसच्या राजवटीत ८५ टक्के भ्रष्टाचार होता असा आरोप मोदींनी केला. त्यांच्यापेक्षा आम्ही कमीच भ्रष्टाचारी आहोत असे सांगण्याचा हा प्रयत्न होता. न खाऊंगा न खाने दूंगा असे म्हणणाऱ्या नेत्याची ही अवस्था! काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात गरिबांसाठी अनेक योजना जाहीर केल्या. शिवाय त्यांचे नेते एकदिलाने लढले. केंद्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे कर्नाटकाचेच असल्याचाही फायदा झाला. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेनेही वातावरणनिर्मिती केली. शिवाय, इंदिराअम्मांच्या काळापासून हे काँग्रेसला अनुकूल असलेले राज्य आहे. तेव्हा रायबरेलीतून हरल्यावर इंदिराजी चिकमगळूरमधून विजयी झाल्या होत्या. सोनिया गांधीदेखील बल्लारीमधून लोकसभेवर गेल्या होत्या. आता येत्या वर्षभरात मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा इत्यादी राज्ये आणि लोकसभा यांच्या निवडणुका आहेत. महाराष्ट्र व ओरिसाच्या निवडणुकाही पाठोपाठ होतील. या सर्व राज्यांमध्ये काँग्रेसलाच नव्हे तर भाजपविरोधी पक्षांना उभारी मिळेल असा हा विजय आहे. या देशातील राजकारण भाजपने एका कोंडवाड्यात अडकवले आहे. त्यातून बाहेर पडून मोकळा श्वास घेण्याचा मार्ग कन्नड जनतेने दाखवला आहे. त्यापासून धडा घेण्याची जबाबदारी इतर राज्यांची व पक्षांची आहे.

विचार

पाळणार का सभ्यतेचे संकेत?

द्वेषमूलक भाषणासारख्या गुन्ह्यामुळे देशाच्या धर्मनिरपेक्षतेला धक्का लागू शकतो, असे निरीक्षण न्या. के. एम. जोसेफ आणि बी. व्ही. नागरत्ना त्यांनी अलिकडे नोंदवले. द्वेषमुलक भाषणे करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले. उत्तरप्रदेश, दिल्ली आणि उत्तराखंड या राज्यांना दिलेल्या या आदेशाची व्याप्ती वाढवून देशभरात अंमलबजावणी करण्याचे त्यांचे मत महत्त्वाचे आहे.

स्वाती पेशवे

सत्ता ग्रहण करण्यासाठी, हाती आलेली सत्ता टिकवण्यासाठी आणि राजकीय विश्वात आपले अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी साम, दाम, दंड, भेद असे सगळे मार्ग खुले असल्याचे बोलले जाते. या सर्व मार्गांने किमान जनतेसमोर, मतदात्यांसमोर तरी आपला वरचष्मा राखण्याचा राजकारण्यांचा प्रयत्न अनेकदा समोर येतो. विरोधकांवर वार करणे, त्यांना नामोहरम वा निरुत्तर करणे हे राजकारणातील एक कौशल्य वा कसब असले तरी हे वार कधी कमरेखाली जातात आणि टीका करताना पातळी कधी खालावते हे सांगता येत नाही. जाहीर सभेमध्ये एकमेकांचा अत्यंत शिवराळ आणि खालच्या, अपमानास्पद भाषेत उल्लेख करणारे नेते अन्य ठिकाणी एकमेकांचे सख्खे मित्र असल्यासारखे वर्तनही करताना दिसत असतीलही; मात्र अशी आक्षेपार्ह भाषा समाजातील शांततेचा भंग करण्याचे कारण ठरु शकते. यामुळे तेढ वाढण्यास मदत होऊ शकते. हा संबंधित व्यक्तीचा मानभंग होऊ शकतो. त्याची समाजातील पत-प्रतिष्ठा धुळीला मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व धोके लक्षात घेऊनच अलिकडेच द्वेषमूलक भाषणे करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले. तसेच संबंधित व्यक्तीविरोधात कारवाई करताना तिचा धर्म विचारात घेतला जाऊ नये, असेदेखील बजावण्यात आले. या व्यक्तीविरोधात कुणाची तक्रार नसली तरीही गुन्हे दाखल करण्याचे आदेश असल्यामुळे या आदेशाचे गांभीर्य जाणून घेण्यासारखे आहे. या निर्णयामुळे भारताचे धर्मनिरपेक्षत्व अबाधित राहू शकेल तसेच याबाबत कारवाईमध्ये कोणतीही दिरंगाई झाल्यास न्यायालयाचा अवमान मानला जाईल, असे सांगणेदेखील अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणायला हवे.

अलिकडेच न्या. के. एम. जोसेफ आणि बी. व्ही. नागरत्ना यांच्या पीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली. द्वेषमूलक भाषणासारख्या गंभीर गुन्ह्यामुळे देशाच्या धर्मनिरपेक्षतेला धक्का लागू शकतो, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. न्यायालयाने २०२२ मध्ये उत्तर प्रदेश, दिल्ली आणि उत्तराखंड या तीन राज्यांना दिलेल्या या संदर्भातील आदेशाची व्याप्ती वाढवून संपूर्ण देशभरात अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. धर्माच्या नावाखाली आपण कुठे पोहोचलो आहोत, असा प्रश्न त्यांनी केला तसेच धर्माची संकुचित केलेली संकल्पना धोक्याची असल्याचे सांगितले. धार्मिक तटस्थता म हणाऱ्या देशात अशा घटना घडणे धक्कादायक आहे. त्यामुळेच द्वेषमूलक भाषणे करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलण्याचे आदेश अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणावे लागतील. घटनेच्या कलम १५३ अ, १५३ ब, २९५ अ आणि ५०५ यांचे उल्लंघन करणारे भाषण किंवा कृती निदर्शनास येईल, त्या वेळी तक्रारीची वाट न पाहता स्वत: दखल घेऊन तातडीने कारवाई करावी; तसेच कायद्याचे चोख पालन होण्यासाठी राज्याच्या पोलिस महासंचालकांनी आदेश द्यावेत, असेही सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शाहीन अब्दुल्ला या पत्रकाराने केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयामध्ये ही सुनावणी झाली. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड सरकारला गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यासाठी मूळ याचिका दाखल करण्यात आली होती.

अब्दुल्ला यांच्या वतीने निझाम पाशा यांनी नवी याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशाचा सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपर्यंत विस्तार करावा आणि प्रत्येक राज्यात एका नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशीही मागणी केली. महाराष्ट्रातील 'पीयूसीएल' या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने बाजू मांडताना वकील संजय पारीख यांनीही नाराजी नोंदवली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही महाराष्ट्रात द्वेषमूलक भाषणे होत असून पोलिस कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाहीत, आमदार आणि खासदारांच्या उपस्थितीत अशी विधाने, भाषणे केली जात आहेत, अशी तक्रार त्यांनी मांडली. यावेळी मतप्रदर्शन करताना सर्वोच्च न्यायालय प्रत्येक घटनानिहाय विचार करू शकत नाही. त्यासाठी आम्ही मोठी नियमांची चौकट तयार केली आहे. आता त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची आहे. प्रत्येक घटनेवर देखरेख आम्हीही करू शकत नाही, असे न्या. नागरत्ना म्हणाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर लक्षात घ्यायला हवे की सध्या संपूर्ण जग भारताकडे आशेने पाहत आहे. ही दृष्टी केवळ अर्थव्यवस्थेपुरते मर्यादित नाही तर देशाचे राजकारण आणि राजकीय पक्ष यांच्यातील संवाद, सहकार्य आणि सहानुभूती आदी बाबींवरही जगाचे लक्ष आहे. मात्र अलिकडे राजकारणाची पातळी खालावली आहे. शूचिता जवळजवळ नाहीशी झाली आहे. सत्तेत नसलेल्यांना तिथे जाण्याची घाई असते, पण त्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करण्याऐवजी ते निराशा आणि हतबलता व्यक्त करत राहतात.

अहिंसेला जनसेवकाचे अलंकार मानणाऱ्या महात्मा गांधींच्या देशात स्वत:ला त्यांचे वारसदार घोषित करणारे नेते सत्तेत आल्यावर वास्तव विसरले. ते गांधींच्या मूल्यांपासून दूर गेले.लोकसेवेऐवजी ते स्वतःची आणि कुटुंबाची सेवा करण्यापुरते मर्यादित राहिले. त्यांच्यापैकी बहुतेकजण ग्लॅमरमध्ये मग्न राहिले. त्यांच्या पुढील पिढ्याही त्याच मार्गावर गेल्या. त्यामुळे राजकारणात अशी अनेक कुटुंबे उदयास आली, ज्यांनी सत्तेपर्यंत पोहोचून अमाप संपत्ती गोळा केली. त्यांच्या पुढच्या पिढीने तो अभिमान आणि दर्जा पाहिला आणि सत्तेपर्यंत पोहोचणे हा जन्मसिद्ध हक्क म्हणून स्वीकारला. तो राखण्यासाठी धाक दाखवण्यास, अत्यंत हलक्या भाषेत बोलण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. वैयक्तिक, भौतिक संचिताच्या सावलीत सार्वजनिक सेवा करता येत नाही आणि त्या स्थितीत अहंकाराची वाढही थांबत नाही. अशा परिस्थितीत जीवनातील शालीनता आणि जनतेप्रती जबाबदारीची भावना स्वार्थाच्या ओझ्याखाली दबून जाते. सध्या भारतातील बहुतांश राजकीय पक्ष याच चक्रात गुंतले आहेत. काही नेते आणि नेते-वंशज यांची भाषिक असभ्यता केवळ सत्ता मिळवण्याची त्यांची दुरवस्था आणि उद्विग्नता दर्शवते. राहुल गांधींचे उदाहरण आपल्यासमोर आहे. अलीकडेच, न्यायालयाने त्यांना एका समुदायाविरुद्ध अयोग्य भाषा वापरल्याबद्दल दोषी ठरवले. यासाठी त्यांना शिक्षाही झाली. परिणामी, त्यांना संसदेचे सदस्यत्व गमवावे लागले.

आज देशातील बहुतांश पक्षांचे आणि राजकारण्यांचे ध्येयही कोणत्याही मार्गाने सत्तेपर्यंत पोहोचण्यापुरतेच मर्यादित राहिले आहे. पण सत्तेपर्यंत पोहोचूनच जनतेची सेवा करता येते असे मानायचे कारण नाही, हे त्यांना समजून घ्यावे लागेल. गेल्या नऊ वर्षांपासून जनतेने सत्तेपासून दूर ठेवलेला काँग्रेस पक्ष अनेक कारणांमुळे स्वत:ला जनतेशी जोडू शकलेला नाही. व्यवहार्य पर्याय बनण्याच्या दिशेने त्याची प्रगतीही झालेली नाही. देशात असाही एक वर्ग आहे, जो काँग्रेसला एक मजबूत पर्याय म्हणून प्रस्थापित पाहू इच्छितो, पण ते त्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाहीत. लोकशाहीमध्ये नागरिकांच्या म ताचा सत्ताधारी पक्ष असलाच पाहिजे, परंतु त्यांना सजग, सक्रिय आणि सतर्क विरोधी पक्षाची उपस्थितीदेखील आवडते. या देशात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांनीही गांधीजींच्या विचारांचा अंगीकार करावा, त्यांनी प्रस्थापित केलेली मूल्ये सद्यस्थितीत समजून घ्यावीत हे अपेक्षित आहे. तरच इथे स्वार्थी राजकारण नाही असे जनतेला वाटेल. सत्तेत परतण्यासाठी उत्सुक असणाऱ्यांना गांधीजींच्या विचारांचा अभ्यास आणि ते समजून घेऊनच सुधारणेचे आणि नवे मार्ग बदलण्याचे स्रोत सापडू शकतात. कोणत्याही संदर्भात द्वेषयुक्त भाषण स्वीकारले जाऊ शकत नाही. फसवणूक आणि बळजबरीने कोणीही सत्तेपर्यंत पोहोचू शकतो, पण जनतेचे मन समजून घेऊन लोकांच्या हृदयात स्थान मिळवणे प्रत्येकाला जमत नाही. म्हणून अशा अयोग्य मार्गांचा वापर केला जातो.

गांधीजींनी तरुण भारतातील स्वातंत्र्याचे महत्त्व, शिस्त आणि नम्रतेची सर्वोच्च गरज स्पष्ट करताना सांगितले होते की, शिस्त आणि नम्रतेतून मिळणारे स्वातंत्र्य हेच प्रत्येकाचे खरे स्वातंत्र्य असेल. असे स्वातंत्र्य कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. सक्षम नसणे आणि संयम गमावणे हे संस्कारहीनतेचे सूचक असल्याचे त्यांचे मत होते. मात्र सध्या भारताची लोकशाही अशा टप्प्यावर पोहोचली आहे, ज्यामध्ये बहुतांश राजकारण्यांनी उत्तम भाषा आणि चांगली वागणूक यांचा पूर्णपणे त्याग केला आहे. लोकसेवकांनी नम्रतेची उंची दाखवावी, हे त्यांचे विचार आज अनेकांच्या स्मरणातही नाहीत. किंबहुना, या विचारांशीही ते पूर्णपणे अनभिज्ञ असल्याचे दिसते. अनेकांना भाषेतील सभ्यतेचे महत्त्व न समजणे निश्चितच खेदजनक आहे. भारतीय राजकारणातील ही मोठी कम तरता म्हणता येईल. त्यामुळे न्यायालयाच्या चपराकीनंतर तरी लोकप्रतिनिधी आणि नेत्यांना याची समज येईल, अशी अपेक्षा आहे.

आजकाल

खेडोपाडी आर्थिक आणीबाणी?

सोमिनाथ घोळवे

नुकतीच (१ ते ६ मे दरम्यान) गावी जाऊन आलो. गावातील आणि परिसरातील अनेकांशी विविध विषयांवर सविस्तरपणे चर्चा करता आली. ग्रामीण भागातील आर्थिक घसरणीच्या भयंकर वास्तवाची कुणकुण होतीच. पण चर्चेतून अनेक समस्यांवर शिक्कामोर्तब झाले. (मी कोरडवाहू गावांविषयी बोलत आहे.)

गेल्या दोन दशकांपासून कोरडवाहू परिसरातील गावांच्या आर्थव्यवस्थेची संथगतीने घसरण चालू आहे, ती थांबलेली नाही. त्यात जीएसटी, नोटबंदी, तीन कोरोना महामारीमुळे करण्यात आलेला लॉकडाऊन असे कितीतरी आघात कृषी क्षेत्रावर (शेतकऱ्यांवर-शेतमजुरांवर) करण्यात आले आहेत. नैसर्गिकपेक्षा मानवनिर्मित आघातांची संख्या जास्त आहे. त्यामुळे अर्थचक्राची घसरलेली गाडी रुळावर अजूनही आलेली नाही. त्यात कोरोना महामारीने तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मोडून टाकला. तरीही ग्रामीण अर्थव्यवस्थेने शासनाच्या मदतीशिवाय स्वतः सावरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सर्व सुरळीत चालू असल्याचा भास निर्माण झाला आहे. वास्तवात अर्थव्यवस्थेची स्थिती आणीबाणीप्रमाणे आहे.

मात्र राज्य व्यवस्थेकडून सकारात्मक पाठिंबा मिळण्याऐवजी अडथळेच निर्माण झालेले दिसून येतात. कोरोना महामारीनंतर एकीकडे शेतीतील बियाणे, खते, कीटकनाशके, वाहतूक, शेती अवजारे इत्यादीच्या किंमती प्रचंड वाढल्याने गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. तर दुसऱ्या बाजूने शेतमालाच्या किंमतीत घसरण करणारी खीळी मारून ठेवल्या आहेत. उदा. गेल्या वर्षीचा सोयाबीन आणि कापूस चांगला भाव मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. हा शेतमाल कसा विकला जाईल हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांच्या समोर आहे. शेतकऱ्यांच्या विरोधातील भूमिका धोरणात्मक पातळीवरून घट्ट करण्यात येत आहेत. ही भूमिका एकट्या शासनाची नाही तर या जोडीला व्यापारी आणि भांडवलदारांनी एकत्र येऊन चालू आहे. शेतकऱ्यांच्या विरोधात मारलेली खीळ कशी काढायच्या हा प्रश्न शेतकऱ्यांच्या समोर उभा राहिला आहे. जरी खीळ काढली तरी पुनः सर्व सुरळीत होणार का?. पुन्हा आडकाठी?. असे अनेक प्रश्न आहेत. एकंदर ग्रामीण भागात आता सर्व सुरळीत चालले आहे असे दिसत असले, तरी कोरोना महामारीपासून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा सुधारलेला नाही. मुळात प्रश्न असा आहे की कोरोना महामारी पासून शेतकरी-शेतमजूर वर्गाचा प्रत्येकवर्षी नुकसान होणे चालू आहे, हे होत असलेले नुकसान कसे भरून काढणार हा गंभीर प्रश्न आहे.

कोरोना महामारीपासून कोरडवाहू शेतकरी खूपच भरडला आहे... बोगस बियाणे (सोयाबीन बियाणे), अतिवृष्टी, कापसावर पडलेला रोगराई, शेतमालाचे घसरले भाव, खते -बियाणे आणि शेती अवजारे यांच्या वाढलेल्या किंमती इ.कारणांनी शेतीचे उत्पन्न घटले आहेच. शिवाय वाढत्या महागाईने जीवनावश्यक घटकांचे दर प्रचंड वाढलेले आहेत. सर्व संकटातूनही थोडाफार उत्पादन मिळाले, ते उत्पादन शेतकऱ्यांना पोटाला चिमटा घेऊन व्यापारी वर्गाला कमी किंमतीत विकावे लागले. उदा. सोयाबीन आणि कापसाचे काय दर आहेत हे पहा. शेतमाल खरेदी करणारी यंत्रणा आगदीच कुचकामी ठरल्याने शेतकऱ्यांना नाईलाजाने व्यापाऱ्यांस शेतमाल विकण्यास भाग पाडले.

ग्रामीण भागात कोरडवाहू शेतकरी वर्गाकडे पैसा कोठून येईल असे मार्ग शिल्लक राहिला नाही. येणाऱ्या खरीप हंगामात बियाणे आणि खते कशी विकत घेणार आणि पेरणी करणार याविषयी आताच शेतकरी खूप चिंतीत आहे. विशेषतः ज्या शेतकरी कुटुंबाच्या घरी बाहेरून (शहरी भागातून किंवा घरातील व्यक्ती बिगरशेती व्यवसायात कमावता नाही असे कुटुंब) पैसा येत नाही. अर्थात केवळ शेतीवर किंवा शेतमजुरीवर उपजीविका आहे. अशा कुटुंबांना गेल्या एक वर्षांपासून वार्षिक उत्पादनाच्या २५ टक्के सुद्धा उत्पादन नाही. या अल्प उत्पादनात शेतकऱ्यांनी भविष्यातील उपजीविका कशी करावी ? हे प्रश्न सतावत आहेत. प्रत्येक गावांमध्ये अशी किमान ६० ते ७० टक्के कुटुंबे ही पूर्णतः शेतीवर किंवा शेतमजुरीकरून असणारी आहेत. या कुटुंबांचा प्रश्न गंभीर आहे. कुटुंबप्रमुखांना खूपच काटकसर करून कुटुंबांच्या आर्थिक गरजा पूर्ण कराव्या लागत आहेत. अनेक कुटुंबांना रेशनच्या धान्यांचा आधार आहे. हा जर आधार नसता तर या कुटुंबांवर आर्थिक आणीबाणी ही निश्चित दिसून आली असते. शिवाय गावोगाव उपासमार झालेली उदाहरणे आतापर्यंत दिसू लागली असते. गावात असे अनेक कुटुंबे आहेत, की त्यांचे दैनंदिन खर्च २० ते ३० रुपये असेल. आठवड्याचा खर्च १५० पेक्षा जास्त नाही. (अगदी चटणी-भाकर, भाकर पिटले, कांदा-भाकर खाऊन दिवस काढत आहे) भाजीपाला आणि सकस आहार मिळत नाही.

सांगण्याचे तात्पर्य, कोरोनाची महामारी आल्यापासून या ग्रामीण भागातील आर्थिक गतिशीलता अतिशय खुंटीत झाली आहे. ग्रामीण भागात अनेक प्रश्न गंभीर स्वरुप धारण करू लागले आहेत... या प्रश्नांना शेतकरी जबाबदार नसताना होरफळ होत आहे.याविषयी गांभीर्याने विचार करावा लागणार आहे.

व्हायरल

द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ, उत्तम प्रशासक

प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार

प्रा. डॉ. राम ताकवले एक द्रष्टा शिक्षण तज्ज्ञ, उत्तम शैक्षणिक प्रशासक आणि सामाजिक भान असलेले विज्ञान शिक्षक होते.त्यांनी तत्कालीन शासनाला मुक्त आणि दूरस्थ प्रणालीने शिक्षण देण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्याची गरज आणि महत्व पटवून दिले. यासाठी आपल्या राज्यात मुक्त विद्यापीठ स्थापन करण्यास भाग पाडले. त्यांच्या ध्येय आणि धोरणातून नाशिक इथे यशंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ १९८९ मध्ये स्थापन झाले. पारंपरिक शिक्षण व्यवस्थेत समाजातल्या सर्वच घटकांना सामावून घेणे कठीण असल्याने मुक्त आणि दूरस्थ शिक्षण पद्धतीने शिक्षणाची, ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचवण्याची त्यांची संकल्पना मुक्त विद्यापीठाच्या रूपाने साकार झाली. या पद्धतीचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. देशात पाहिले मुक्त विद्यापीठ १९८२ मध्ये हैद्राबादला स्थापन झाले. त्यानंतर १९८५ मध्ये दिल्लीत इंदिरा गांधी



डॉ. राम ताकवले

राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ कार्यान्वीत झाले. त्यांनी केलेल्या भरभक्कम पायाभरणी मुक्त विद्यापीठाची यशस्वी वाटचाल सुरू आहे. त्यांनी मुक्त विद्यापीठात अभिनव शैक्षणिक उपक्रम तर राबवलेतच पण त्याच्या जोडीला अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमही सुरू केलेत. कविवर्य कुमाग्रज यांच्या 'विशाखा' या काव्य संग्रहाच्या नावे नवोदीत कवीला पुरस्कार, ज्येष्ठ कथा लेखक बाबुराव बागुल गौरव कथा लेखन पुरस्कार हे दोन सन्मान सुरू केले. असे पुरस्कार देणारे यशंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे राज्यातले पाहिले विद्यापीठ होय. शिवाय यशवंतराव चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनी त्यांना अभिवादन करणारे लोकसंवाद सत्र देखील सुरू केले. शिवाय कुसुमाग्रज यांच्याकडून विद्यापीठ गीत लिहून घेतले. राष्ट्र सेवा दलाचे संस्कार लाभलेल्या ताकवले सरांचे राज्यातल्या शिक्षण संस्थाचालकांशी, विद्वान प्राध्यापकांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. यामुळेच मुक्त विद्यापीठ स्थापन झाल्यावर लगेचच राज्यातल्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांनी मुक्त विद्यापीठाची अभ्यासकेंद्रे सुरू करून शिक्षणाच्या लोकशाहीकरण्याच्या या चळवळीत योगदान दिले. याचे श्रेय ताकवले सरांचे. ताकवले सर मुक्त विद्यापीठाचे आधारस्तंभ होते. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

लोकसंसद

सिमकार्ड तपासा

देशात वेगाने डिजिटल क्रांती होत असताना सायबर गुन्ह्यातही वेगाने वाढ होत आहे. विशेष म्हणजे सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये ९९ टक्के बनावट सिमचा वापर केला जात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अलीकडेच फेक सिम कार्ड वापरून होणारे गुन्हे रोखण्यासाठी एका आयडीवर ९ सिम कार्ड ऐवजी फक्त ४ सिम कार्ड देण्याची योजना आखली आहे. ही योजना किती आवश्यक आहे याचा पडताळा नुकताच मुंबई पोलिसांना आला. मुंबई पोलिसांनी, एका फोटोचा वापर करुन हजारो सिमकार्ड बनवून अवैधरित्या विकणाऱ्या १३ आरोपींना अटक केली आहे. एकाच व्यक्तीचे वेगवेगळ्या अँगलमधून काढून शेकडो सिमकार्ड जारी करण्याचा उद्योग हे लोक करत होते. या प्रकरणांमध्ये त्यांच्याकडून २ हजार १९७ सिमकार्ड, चार लॅपटॉप आणि ६० मोबाईल जप्त केले आहेत. ६२ जणांनी स्वत: चे फोटो वापरुन एकूण ८ हजार ५०० सिमकार्ड तयार केल्याचे समोर आले आहे. या सिमकार्डचा वापर सायबर गुन्हेगार, बनावट कॉल सेंटर, क्रिकेट बुकी आणि इतर आर्थिक गुन्ह्यांसाठी झाल्याचा पोलिसांना संशय आहे. अशावेळी आपल्या नावावर नेमके किती सिम कार्ड जारी करण्यात आले आहे हे प्रत्येकाने वेळोवेळी तपासून पाहणे गरजेचे झाले आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

भिंत

संन्याशांचा एक जथा एकदा चीनला गेला.

त्यांच्यातल्या एका संन्याशाला भिंतीकडे तोंड करून बसण्याची सवय होती.

भक्तगणांचा जमाव त्याच्यामागे गोळा होत असे आणि तो मात्र भिंतीकडे तोंड करून बसायचा. त्यांच्याकडे कधी वळून पाहायचाही नाही.

मठामध्ये खबर आली की आज सम्राट भेटीला येणार आहेत. सगळ्या संन्याशांनी या संन्याशाला बजावलं, ही तुझी थेरं आज तरी बाजूला ठेव. सामान्य माणसांपुरतं ठीक आहे. मात्र, सम्राट आला की त्याच्याकडे तोंड कर. तो काही सामान्य माणूस नाही. सम्राटाला राग आला तर पंचाईत होईल. सगळेच संकटात सापडू.

तो म्हणाला, माझ्यासाठी प्रत्येक माणूस विशेष आहे. सामान्य माणूसही सम्राटच आहे. माझ्याच्याने भेद होणार नाही.

सुदैवाने सम्राट सुजाण निघाला. त्याने पाठ केलेल्या संन्याशाला विनम्रपणे विचारलं, भगवन्, आपल्यामागे माणसांचा मोठा समुदाय उभा आहे. आपण त्याकडे पाठ का केली आहे?

संन्यासी म्हणाला, मी आधी सगळ्यांकडे तोंडच करून बसायचो. तेव्हाही मला समोर अभेद्य अशी भिंतच जाणवायची. म्हणून मी ठरवून टाकलं की भिंतच असणार असेल तर ती दगडमातीची बरी.

- ओशो

निवडक

पारा ३८ अंशावर

कोलाड : कोलाड परिसरातील तापमानाचा पारा ३८ अंशावर गेला असून तो अधिक वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे अंगातून घामाच्या धारा वाहत असून सहन न होणारे उन्हाचे चटके यामुळे उन्हाच्या झळा तापदायक ठरत असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतांना दिसत आहे. सध्या उन्हाळी सुट्टी असून या परिसरातील चाकरमानी गावाकडे आले आहेत. परंतु कडक पडलेल्या उन्हामुळे सकाळी ९ वाजल्यासून कोणी बाहेर फिरकत नाही. रस्ते निर्मनुष्य बनले आहेत. बाजारपेठेत कोणीही फिरकत नसल्यामुळे व्यवसायावर ही परिणाम झालेला दिसत आहे.

विकासकामाचे भूमिपूजन

गोवे-कोलाड : खा. सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवली ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामाचे भूमिपूजन व उद्घाटन शनिवार (दि.१३) रोजी आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बंधूखोत येरुणकर, दयाराम पवार, प्रितम पाटील, सुरेश महाबळे, राकेश शिंदे, दर्शना पवार, पांडुरंग भोनकर, राजेश कदम, संजय राजिवले, उत्तम बाईत,राहुल शिंदे,राकेश लोखंडे, जगन्नाथ धनावडे, महादेव धसाडे, दगडु शिगवण,शिरीष येरुणकर सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कन्याशाळेचे भूमिपूजन

तळा : शहरातील कन्याशाळेच्या नूतनीकरणाचे भूमिपूजन तहसीलदार स्वाती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेत विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत वाढ झाल्याने विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यांची कमतरता भासू लागली. याची माहिती कृष्णा महाडिक यांना समजताच त्यांनी चंदूलाल मेहता चॅरिटी ट्रस्ट व कमलेश भाई मेहता यांच्या अर्थसहाय्याने कन्या शाळेच्या नूतनीकरणाचे काम हाती घेतले व त्याचे भूमिपूजन तळा तहसीलदार यांच्या हस्ते करण्यात आले.

बचत गटाला मदत

नेरळ : कर्जत तालुक्यातील शेलूग्रामपंचायतीमध्ये महिला स्वयंसहायता बचत गटाकडून अनेक उपक्रम जातात. त्याचवेळी या गटामधील महिला अनेक वेगवेगळं व्यवसाय देखील करीत असतात. त्यामुळे शेलू ग्रामपंचायतीकडून ओम साई महिला स्वयंसहायता बचत गटाला मदतीचा हात दिला आहे. या बचत गटाला आपल्या पाच टक्के अनुदानातून साहित्य शिवाजी खारीक यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी वीणा गमरे, चिंता कोंडीलकर, कांता निमणे, बुधी दरवडा, यांच्यासह अनेक प्रमुख उपस्थित होते.

भागवत कथांचे आयोजन

पनवेल : सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त पनवेलच्या साईबाबा मंदिर येथे १९ मे पर्यंत श्रीमद भागवत कथा सप्ताहचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल रेल्वे शुक्रवार १९ मे पर्यंत संध्याकाळी ५ ते ८ च्या दरम्यान पूज्य श्री विद्यांशु महाराज यांचे श्रीमद भागवत कथा सप्ताहचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थितीती असल्याची माहिती श्री भगवती साई संस्थानच्या श्री साई नारायण बाबा आश्रमच्या वतीने देण्यात आली आहे.

दिन वार्ता

पंचांग

१५ मे २०२३
सोमवार
विक्रम संवत्- २०७९
वैशाख शके संवत्- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- उत्तरायण
मास- वैशाख
ऋतु- वसंत
कृष्ण पक्ष
तिथि : एकादशी २५:०३:२४+
नक्षत्र:पूर्वाभाद्रपद ०९:०८:२१
योग : विष्कुम्भ २५:२९:३५+
करण:बव १३:५३:०६
करण : बालव २५:०३:२४+
सूर्य : वृषभ ११:४८:५४
चन्द्र : मीन०३:२४:०१
हिजरी सन् - १४४४
मुस्लिम मास - शव्वाल
तारीख - २४
विशेष : अपरा एकादशई, अगस्ती लोप
पारनेरकर महाराज वार्षिकोत्सव - पारनेर

सुडोकू

3			4		9		1	
2	1	7			6	9	4	
4	5							
		5			1	3	9	4
			8		3			
1	2	3	9			5		
							7	9
	4	6	1			8	5	2
	7		2		5			6

रविवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

5	1	9	7	4	3	2	8	6
3	4	8	2	5	6	7	1	9
2	6	7	8	1	9	5	4	3
9	2	4	1	6	8	3	7	5
8	5	1	9	3	7	6	2	4
7	3	6	5	2	4	1	9	8
6	8	3	4	7	1	9	5	2
1	9	2	3	8	5	4	6	7
4	7	5	6	9	2	8	3	1

पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

रायगडसह महाराष्ट्रात उन्हाळ्याच्या दिवसात भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची आंबेघर वेलशेत नजीक असलेली पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असताना एमआयडीसी प्रशासन सुस्त असल्याने जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

एमआयडीसी प्रशासन सुस्त

मार्च, एप्रिल व मे महिन्यात उन्हाळ्यात अनेक गावे, वाड्या वस्त्यांना पाणीटंचाईच्या झळा पोहचतात. तहानलेल्या गावातील नागरिक घोटभर पाण्यासाठी वणवण भटकतात. तर दुसऱ्या बाजूला एमआयडीसीतून पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया गेले. पाण्याचे उडणारे जोरदार फवारे जलद बंद व्हावेत यासाठी तात्काळ कोणतीही यंत्रणा त्याठिकाणी आलेली नाही, प्रत्येक वेळी या पाईपलाईन फुटतात, पाण्याचे तलाव साचतात.

सातत्याने अशाप्रकारे पाईपलाईन फुटून मोठ्या

प्रमाणावर पाणी वाया जाऊन राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होते, मात्र संबंधित प्रशासन याकडे कानाडोळा करताना दिसतो, त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असल्याने पर्यावरण प्रेमी व जनतेतून संताप व्यक्त केला जातोय.

रस्त्यावरील शीतपेयांमुळे आरोग्य धोक्यात

। उरण । वार्ताहर ।

उन्हाळा सुरू होताच अंगातील उष्मा कमी होण्यासाठी अनेकांची पावले शीतपेयांकडे वळतात; मात्र ही शीतपेये बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बर्फामुळे पोटाच्या विकारांना सामोरे जावे लागत असल्याने आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे रस्त्यावरील बर्फाचे सेवन टाळावे, असे आवाहन आरोग्यतज्ज्ञांनी केले आहे.

उन्हाचा पारा चढता असल्याने सध्या शीतपेयविक्रेत्यांची चलती आहे. शहरात उसाचा रस, फळांचा रस, गोळा, सरबत बनवण्याचे व्यवसाय जागोजागी सुरू आहेत. यासाठी वापरण्यात येणारा बर्फ आरोग्याच्या दृष्टीने घातक असल्याचे वारंवार दिसून आले आहे. कारण हा बर्फ थेट पाणी किंवा व्यावसायिक टँकरने पुरवठा केलेल्या पाण्यापासून तयार केला जात असल्याने जुलाबाला कारणीभूत ठरणाऱ्या जीवाणूंच्या संसर्गाचा धोका अधिक असतो. त्यामुळे दूषित पाण्याने तयार केलेला बर्फ खाल्ल्याने रोग बळावण्याचा धोका असल्याचे डॉक्टरांचे मत आहे.

सुक्या मच्छीला मागणी वाढली

। माणगाव । वार्ताहर ।

पावसाळा जवळ आल्याने घरगुती वापराच्या वस्तूंची बेगमी करण्याकडे गृहिणी वळल्या असून पावसाळी दिवसांसाठी आवश्यक असणारी सुकी मासळी खरेदी करण्याकडे गृहिणींचा कळ वाढला असून सुक्या मासळीला मोठी मागणी आहे.

श्रीवर्धन, भरडखोल, दिघी या ठिकाणावरून सुकी, ओली मासळी मोठ्या प्रमाणात येते. तालुक्यातील गावागावात जाऊन कोळी बांधव मोठ्या प्रमाणात सुकी मासळी विक्री करीत असतात. शहरी, ग्रामीण भागात या सुक्या मासळीला चांगली मागणी असते. बदलते हवामान व अवकाळी पाऊस यामुळे सुक्या मासळीच्या उत्पादनावर परिणाम झाला असून परिणामी सुक्या मासळीचे दर वाढले असून जवळा सुकट, अंबाडी, सुके बोंबील, वाकटी इत्यादी सुक्या मासळीचे दर वाढले असून कमीतकमी ४०० रुपयांच्या पुठे पोहोचले आहेत. सुक्या मासळीचे भाव वाढले असल्याने गृहिणींचे आर्थिक गणित बिघडत आहे.

भटक्या कुत्र्यांविरुद्ध विशेष मोहीम

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महापालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचा दिवसेंदिवस वाढणाऱ्या त्रासामुळे नागरिक त्रस्त झाले होते. या भटक्या कुत्र्यांचा कायमचा बिमोड करण्याची मागणी त्रस्त नागरिकांकडून केली जात होती. त्यानुसार पनवेल महापालिकेच्या माध्यमातून या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात आला असून या भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण करण्यात आले आहे.

पनवेल शहर आणि आजूबाजूच्या परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला होता. शहरातील कचराकुंड्या, रेल्वे स्टेशन, मंदिर परिसर, शाळा पटांगण, सोसायट्यांच्या आवारात सर्वत्र या मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिक, शालेय विद्यार्थी कमालीचे त्रस्त झाले आहेत. हे कुत्रे रात्री उशिरा येणाऱ्या नागरिकांना लक्ष्य करीत असल्याने नागरिकांमध्ये दहशत पसरली होती. अनेकदा शाळकरी विद्यार्थ्यांचा कुत्र्यांकडून पाठलाग केला जात असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या भटक्या कुत्र्यांचा कायमचा बिमोड

करण्याची मागणी त्रस्त नागरिकांकडून केली जात होती. त्यानुसार पनवेल महापालिकेच्या माध्यमातून या भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेच्या कारभारावर समाधान व्यक्त केले आहे.

नर्सरीत प्रवेशाच्या बहाण्याने लाखाचा गंडा

। पनवेल । वार्ताहर ।

नर्सरीत मुलांचे ॲडमिशन घेण्याच्या बहाण्याने एका सायबर चोरट्याने पनवेलमधील नर्सरीचालक महिलेला एक लाखांचा गंडा घातला आहे. पनवेल शहर पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

तक्रारदार महिला पनवेल भागात लहान मुलांची नर्सरी चालवते. गेल्या महिन्यात या महिलेला मुलांचे ॲडमिशन घेण्याच्या बहाण्याने एका सायबर चोराने संपर्क साधला होता. या वेळी समोरील व्यक्तीने त्याची पत्नी पनवेलमध्ये राहण्यास असून बॉर्डरवर कामाला असल्याचे सांगितले होते. तसेच मुलांची फी ॲडव्हॉन्समध्ये पाठवत असल्याचा बहाणा करून महिलेला यूपीआय आयडीवरून एक रुपया पाठवण्यास सांगितले. त्यानुसार महिलेने एक रुपया पाठवल्यानंतर शाळेच्या फीची संपूर्ण रक्कम पाठविल्यास रक्कम डबल करून पाठविण्याचा बहाणा केला. त्या वेळी महिलेने पुन्हा ४८ हजार रुपये पाठवून दिले. मात्र, त्यानंतर सायबर चोराने मोबाईल फोन बंद करून टाकल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

वसंत जोशी यांचे निधन

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत मधील जेष्ठ साहित्यिक वसंतराव जोशी यांचे वार्धक्याने ९३ वर्षी निधन झाले. त्याच्या अतंयात्रेस समयी राजकीय, सामाजिक, साहित्य क्षेत्रातील अनेक मंडळी उपस्थित होते. महात्मा गांधी, विनोबा भावे यांच्या वाङ्मय्याचे ते अभ्यासक होते.

त्याचा रायगड जिल्हा परिषदेने त्यांना रायगड भूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. तसेच विनोदी लेखनासाठीचा जयवंत दळवी पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला होता. त्यांनी आकाशवाणीसाठी अनेक नभोनाट्य, श्रुतिका, संगीतिका, मालिकांचे लेखन केले होते. तसेच दूरदर्शन वरील मुलाखती व मालिकांमध्येही त्यांचा सहभाग होता.

शब्दकोडे क्र.१२४



आडवे शब्द :१. प्रख्यात, सुप्रसिद्ध, ३. पहारेकरी, ७. आभाराचा शब्द, १०. लावणीतील लावण्यवती, ११. भार, बोजा, १२. संतुष्ट झालेला, १३. डोंगराचा कोसळणारा भाग, १५. अपमान, १७. जुनाच्या विरुद्ध, १९. घोटाळा, २०. संरक्षक भिंत, २२. गडीमाणसे, २६. सरपटणारा घरातील प्राणी, २७. हाताचा तळवा, ३०. श्रम, मेहनत, ३१. वेळ घालविणे, ३२. सूर्याचे एक नाव, ३३. ब्रश (चित्रकाराचा), ३४. आवकीचे खाते, ३६. प्रतिस्पर्धी, ३७. कुबड, ३९. वस्तू, माल, ४०. सैन्याचा दाणागोटा, ४२. झाडलोट शिंपण इत्यादी, 'सडा ----', ४५. कर्मदरिद्री, ४६. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (नाव), ४८. समुद्र, ५०. दाट, घट्ट, ढग, ५१. सत्ता, ५३. डाळिंब्या, ५४. अजागळ, ५६. पृथ्वी, ५७. गणपतीचे एक नाव, ५८. पोलीस ठाण्याचा प्रमुख (हिंदी), ६०. सारासार विचार, ६२. आकाश, ६३. छोटासा, ६४. शाळा, ६७. परीक्षा, तपासणी, ६८. ढीग, ६९. जाळणारी, अति तीव्र, ७१. सहा आसनी रिक्षा, ७५. मार्गस्थ, ७७. चौसोपी अनेक खोल्यांचे घर, ७८. कर्ण, ७९. अरण्य, ८०. अजूनही स्त्रियांचेच समजले जाणारे काम, ८१. जोडीतील एक चर्मवाद्य.

उभे शब्द : १. 'पक पक पकाक'चा नायक, २. मृत्यू, ३. गवंडी, रहस्य (हिंदी), ४. खोदकाम, ५. सेवक, ६. रमापती, ७. मालक, ८. सोसाट्याचा वारा, ९. किंमत, ११. वर-वधूची मिरवणूक, १४. दुप्पट (इंग्रजी), १६. फुरसत, विश्रांती, १८. वाणी, बोलणे, १९. घट्ट पकड असणारा सरपटणारा प्राणी, २१. दारावरील खुणेचा आवाज, २३. आवरण, २४. एक आंबट पालेभाजी, २५. विद्या, २६. लेंगा, २८. बहुतेकांसाठी साप्ताहिक सुट्टीचा दिवस, २९. लाजिरवाणे, ३३. पंडु राजाच्या दोन बायकांची नावे, ३५. माणूस, ३८. काळी मैना- एक बोर प्रकार, ३९. 'बुगडी'च्या गाण्यातील गाव, ४१. एक तारवाद्य, ४२. शक्यता, ४३. नेत्राला , मविणारे दृश्य, ४४. विश्रांती, आराम, ४५. राजसभा, ४७. वुर्तळ, ४९. अव्यवस्थित कारभार, ५२. वेडावाकडा, ५४. भीम जवळचे शस्त्र, ५५. तारणारा, ५७. भव्य, ५९. भित्रा, अव्यवस्थित वागणारा, ६०. दिनांक, इतिहास (हिंदी), ६१. अगदी त्याचप्रमाणे, ६३. पोते, ६४. वितरण करणारा, ६५. जेव्हा, ६६. जुगाराचा एक प्रकार, ७०. विश्वास, खात्री, भरोसा, ७२. अंत:करण, ७३. सोनसळी धान्य, ७४. दीर्घच्या विरुद्ध, ७६. 'आजोबा' हाक मारणारी.

शब्दकोडे क्र.१२३ चे उत्तर

आडवे उत्तर

१.तुडुंब ३.भारतीय जनता पक्ष १०.रतन १२.रमी १३.वीर १४.मालामाल १६.राजवाडा १८.भाक १९.आन २०.वाया २१.रस २२.मन २३.चुरमा २४.लचकणे २७.तनमनधन ३०.कप ३२.वाल्याकोळी ३४.टवका ३६.सण ३७.स्थगन ३९.नरकयातना ४१.पोळी ४२.गरबा ४३.कदरदान ४४.तवा ४६.कासार ४७.पाखरू ४९.लाट ५०.पाकळी ५१.माननीय ५३.सुपाचक ५५.कारक ५६.भीरू ५७.सोहळा ५८.लाज ६०.तीर ६२.पापणी ६४.कुडी ६५.जामात ६७.सोयरा ६८.मासा ६९.गजराज ७२.तलम ७३.सर्व ७४.वरचेवर ७७.समाधान ७८.नयनाट ७९.घण

उभे उत्तर

१.तुकाराम २.बरवा ३.भान ४.तीरकमान ५.यमी ६.नवीन ७.तार ८.क्षमायाचक ९.सालस ११.तडा १५.मारणे १७.जनकल्याण १८.भारत १९.आनन २०.वाल २५.कपट २६.जळीस्थळीकाष्ठीपाषाणी २८.मदनबाण २९.धनिक ३१.बोका ३२.वासलात लावणे ३३.होतकरू ३५.वरदायिनी ३८.नगर ४०.नाद ४५.वाट ४७.पाककला ४८.खळी ५०.पार ५१.मारुती ५२.यत्किंचित ५४.कसोटी सामना ५५.काळाकुट्ट ५९.जहाज ६१.रजा ६२.पायजमा ६३.परा ६६.मानव ६८.माल ६९.गर्व ७०.रावण ७१.जर ७२.तन ७३.सट ७५.चेष्टा ७६.रद्दी

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

शुक्रवार ते रविवार कालावधीत प्रवाशी संख्येत वाढ

खासगी बसमुळे प्रवाशांचा खिसा रिकामा

। पनवेल । वार्ताहर ।

उन्हाळी सुटीनिमित्त बाहेरगावी तसेच पर्यटनाला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. याचाच गैरफायदा घेत खासगी व्यावसायिकांनी बस भाड्यामध्ये दुपटीने वाढ केली आहे. अशातच शुक्रवार ते रविवार या कालावधीत प्रवाशांची संख्या वाढत असल्याने दुपटीने भाडे आकारत बेसुमार लूट केली जात आहे.

वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा सायन-पनवेल महामार्गावरील कळंबोली या ठिकाणाहून पुण्यासह पश्चिम महाराष्ट्र व परराज्यातही मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होत आहे.

मुंबई-पुणेसाठी ३५० रुपये

मुंबई, कळंबोली, पनवेल या ठिकाणांहून पुण्याला जाण्यासाठी दररोज हजारो सरकारी तसेच खासगी बस ये-जा करतात. कळंबोली येथून मुंबई पुणे द्रुतगतीमार्ग सुरू होत असल्याने या ठिकाणी मोठ्या-प्रमाणात खासगी बसमधून प्रवाशांची चढ-उतार केली जाते. नेहमीच्या काळात कळंबोलीवरून पुण्याला जाण्यासाठी खासगी चारचाकी किंवा बस साधारण १५० ते २०० रुपये भाडे आकारते; परंतु सध्या सुट्टीचा हंगाम असल्याने हेच दर आता २५० ते ३५० वर जाऊन पोहोचले असल्याने मुंबई-पुणे प्रवासदेखील महागला आहे.

हेच दिवस आहेत कमवायचे

खासगी प्रवासी वाहनचालकांवर कुठल्याही प्रकारचा अंकुश नसल्याने या ठिकाणी मनमानी भाडे आकारण्यात येते. यासंदर्भात खासगी वाहनचालकांला विचारले असता सीझन आहे साहेब, हेच दिवस पैसे कमवायचे आहेत. सध्या प्रवाशांनासुद्धा गरज आहे. त्यामुळे थोडी घासाघीस करून वाढीव भाडे देत आहेत.

> शासनाने निर्धारित केलेले एसटी बसच्या भाडे टप्प्यापेक्षा पन्नास टक्क्यापर्यंत भाडेवाढ करू शकतो; परंतु, त्यापेक्षा जास्त भाडे आकारल जात असेल, तर तक्रार केल्यास खासगी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
> – नीलेश धोटे,
> सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल

अशात शाळांना सुट्टी लागल्याने बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्याने एसटीबरोबरच खासगी वाहनांनादेखील प्रतिसाद मिळत आहे; पण प्रवाशांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन खासगी वाहनचालकांनी मोठ्या प्रमाणावर भाडेवाढ केली आहे. यामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद, हैदराबाद, जालना, कोल्हापूर, सांगली या लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या तिकीट दरामध्ये मोठी वाढ झाली असून दोन महिन्यांपूर्वी एक हजार ते पंधराशे रुपयांदरम्यान असणारे भाडे ५० टक्क्यांनी वाढल्याने प्रवाशांचा खिसा रिकामा होणार आहे.

निवडक

घरफोडी करणाऱ्यास अटक

पनवेल : पनवेल तालुक्यातील हेदूटणे येथील घरात चोरी करणाऱ्या चोराला पकडून रहिवाशांनी पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या प्रकरणी चोराविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.मोहम्मद अहसान मोहम्मद इसामोल सब्जी फरोज (२२) याने दिगंबर राधाकांत झा यांच्या राहत्या घराची बाथरूमची खिडकीची काच काढली आणि त्याद्वारे घरात प्रवेश करून पाच हजारांचा मोबाइल आणि दोन हजार १०० रुपये रोख रक्कम चोरी करून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना नागरिकांनी पकडले.

महिला बेपत्ता

रसायनी : सिध्देश्वरी कॉर्नर येथील बेलेंत्रा सोसायटीमधील एक विवाहित महिला घरी कोणाला न सांगता निघून गेल्याने तिच्या पतीने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सिध्देश्वरी कॉर्नर येथील बेलेंत्रा सोसायटीमधील धोंडीबा काकडे यांची पत्नी प्रणाली काकडे (वय २५) या राहत्या घरातून निघून गेल्या. दुसऱ्या दिवशी परत आपली पत्नी घरी न आल्याने धोंडीबा काकडे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात पत्नी हरविल्याची तक्रार दाखल केली आहे.

साफसफाईची मागणी

पनवेल : पनवेल महापालिका क्षेत्रातील प्रभाग १७ मधील नविन पनवेल सेक्टर १३ येथील ए टाईप मधील वसाहती मधील गटारांची साफसफाई व दुरुस्ती पावसाळ्यापुर्वी करून देण्याची मनोज भुजबळ यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सदर गटारांतील खराब पाण्याच्या निचरा मोठ्या गटारात होत नाही. सदर खराब पाणी जागोजागी साचते व ते पाणी घराखालील पायांमध्ये मुरते त्यामुळे तेथील घरांना देखील धोका निर्माण होऊन प्रचंड दुर्गंधी सुद्धा येत राहते.

मुलासह आई बेपत्ता

रसायनी : पत्नीला व मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार चावणे येथील एका इसमाने रसायनी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. चावणे येथील अनिल सोनावळे यांची पत्नी अनुष्का सोनावळे (वय २८) व मुलगी प्रियांशील अनिल सोनावळे (वय ७) यांना कुणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले आहे. आपली पत्नी व मुलगी अद्याप न सापडल्याने अनिल सोनावळे यांनी पत्नीला व मुलीला कोणीतरी पळून नेल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

मंगळसूत्र चोरी

पनवेल : पनवेल ते सीएसएमटी लोकल रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेचा मंगळसूत्र अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना घडली आहे. खारघर सेक्टर १८ मध्ये राहणाऱ्या रश्मी शर्मा ह्या पनवेल सीएसएमटी लोकल रेल्वेने प्रवास करत असताना खारघर ते जुईनगर दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ४३ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरले आहे. याप्रकरणी रश्मी शर्मा यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

चिकन विक्रेत्यांमुळे स्मशानभूमी प्रदूषित

गावातील परिसर गलिच्छ, ग्रामस्थांची कारवाईची मागणी

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतमधील स्मशानभूमीचा परिसर सध्या दुर्गंधीयुक्त बनला आहे. नेरळ बाजारपेठेत व्यवसाय करणारे चिकन विक्रेते यांच्याकडून सडलेल्या कोंबड्या आणि शिल्लक मांस हे तेथे स्मशानभूमी परिसरात टाकण्यात येत आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतकडून या चिकन विक्रेते यांच्यावर कधी कारवाई होणार? हा प्रश्न असून सडलेले मांस टाकणाऱ्यावर कारवाइची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

नेरळ ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम समजली जाते. त्यात माथेरान या पर्यटन स्थळाचे प्रवेशद्वार म्हणून माथेरानची ओळख आहे. त्यामुळे नेरळमध्ये असलेली बाजारपेठ गर्दीने फुललेली असते. त्यात त्या बाजारपेठेत व्यवसाय करणारे व्यावसायिक यांच्यात मच्छी आणि चिकन तसेच मटण विक्रेते देखील आहेत. त्यापैकी चिकन विक्री करणाऱ्या व्यावसायिक यांच्याकडून नेरळ गावातील चांगला परिसर गलिच्छ होत आहे.

गावातील बाजारपेठ भागात आणि अन्य ठिकाणी चिकन मांस विकणाऱ्या व्यवसायिक यांच्याकडून संध्याकाळी सडलेल्या कोंबड्या, शिल्लक राहिलेले मांस आणि

> बाजारात व्यवसाय करणाऱ्या चिकन विक्रेते यांना सूचना देणार असून तरी देखील अशी कृत्य करणाऱ्यांवर पोलीस कारवाई केली जाईल.
> - गणेश गायकर
> ग्रामविकास अधिकारी

चिकनची पिसे ही सर्व घाण नाल्यात टाकले जाते. सध्या नेरळ गावातील टॅक्सी स्टँड तसेच नेरळ पोलीस ठाणे जवळील पुलावरून खाली नाल्यात आणि सर्वाधिक कचरा हा स्मशानभूमी जवळ टाकला जातो. त्याचा परिणाम स्मशानभूमी येथे कार्यासाठी आलेले ग्रामस्थ आणि पाहुणे यांना दुर्गंधीमुळे त्या ठिकाणी काही उभे राहता येत नाही. दुसरीकडे स्मशानभूमी परिसरातून एक रस्ता मोहाची वाडी आणि अन्य आदिवासीवाडीकडे जात असतो, त्यामुळे त्या भागातील लोकांना देखील दुर्गंधी सहन करावी लागते.

नेरळ ग्रामपंचायतीकडून सायंकाळी आठ वाजता ग्रामपंचायतीचे घंटा गाडी ही नेरळ बाजारपेठमध्ये जाते आणि तेथून सर्व कचरा उचलून नेत असते. त्यात चिकन आणि मच्छी विक्रेते यांच्याकडील मांस हे प्रामुख्याने उचलून नेले जाते. तरीदेखील स्मशानभूमी परिसरात कचरा टाकण्यात येत असल्याने ग्रामपंचायतीकडून कारवाई करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. दोन वर्षापूर्वी कारवाई केली होती. आता पुन्हा एकदा नेरळ ग्रामपंचायत कचरा टाकणाऱ्या चिकन व्यवसायिक यांच्या कारवाईचा बडगा उगारला पाहिजे, अशी मागणी ज्येष्ठ ग्रामस्थ सूर्यकांत चंचे यांनी केली आहे.

गट शिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांचा सन्मान

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढावी. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, यासाठी पुढाकार घेऊन भुमिका बजावल्याबद्दल अलिबागचे गट शिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांचा सन्मान करण्यात आला. माणगाव तालुक्यातील निजामपुर येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या हस्ते हा सन्मान नुकताच करण्यात आला.

कृष्णा पिंगळा गेल्या अनेक वर्षापासून शिक्षण विभागात कार्यरत आहेत. यापुर्वी त्यांनी १२ वर्षे सुधागड तालुक्यात रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम केले. त्यानंतर त्यांना विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली. तीन वर्षे अलिबागचे गट शिक्षण अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. सध्या त्यांच्याकडे गट शिक्षण अधिकारी म्हणून धुरा देण्यात आली आहे. माणगाव परिसरातील नवोदय विद्यालयामार्फत १२ वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला जातो. सीबीएसई बोर्डाशी संलग्न असलेल्या निवासी नवोदय विद्यालयात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा प्रवेश करण्याबाबत प्राचार्यांनी आवाहन केले होते. या आवाहनाला दुजोरा देत गट शिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांनी नवोदय विद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. त्यानुसार २०२२-२०२३च्या तुलनेने २०२३- २०२४ मध्ये परीक्षार्थी नोंदणीत सरासरी टक्केवारीमध्ये वाढ करण्यात अलिबाग केंद्राची महत्वाची भुमिका ठरली.

मुलीस पळवून नेणाऱ्यास अटक

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीस तिच्याच कॉलेजमधील अल्पवयीन तरुणाने फूस लावून गोवा राज्यात पळवून नेल्याची घटना घडली आहे. पनवेल शहर पोलिसांनी गोवा येथे जाऊन दोघेही तरुण-तरुणींना ताब्यात घेतले आहे. १७ वर्षीय तरुणीचे तिच्याच कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या तरुणासोबत प्रेमसंबंध जुळले. त्यांनतर त्या दोघांनी घरच्यांना काहीच माहिती न देता गोवा राज्यात पलायन केले.

याबाबतची तक्रार सदर तरुणीच्या घरच्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनील गिरी हे अधिक तपास करीत असताना गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाद्वारे या दोघांचा शोध घेत असताना ते दोघे जण गोवा राज्यातील कलंगुट बीच परिसरात वास्तव्यास असून तेथेच नोकरी करत असल्याचे आढळून आले.

तांत्रिक तपासाच्या आधारे सदर मुलगा काम करीत असल्याचा ठिकाणाहून ताब्यात घेतले व त्याने फूस लावून पळवून आणलेल्या मुलीबद्दल विचारणा केली असता तिच्या बाबतची माहिती पोलिसांना दिली. त्यांनतर या पथकाने सांगितलेल्या ठिकाणी जाऊन सदर पीडित मुलीला ताब्यात घेतले व पनवेल शहर पोलीस ठाणे येथे आणण्यात आले. त्यांनतर कायदेशीर बाबींची पूर्तता करून सदर मुलीला तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. व मुलीला पळवून नेणाऱ्या तरुणाच्या विरोधात नियमानुसार गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक सुनील गिरी यांनी दिली आहे.

प्रा. आ. केंद्रासमोर धोकादायक खड्डा

। नागोठणे । वार्ताहर ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगतच असलेल्या नागोठण्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील रस्त्यावरील पेव्हर ब्लॉक निघाल्याने एक भला मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या अधिका-यांनी याकडे डोळेझाक केली आहे. त्यामुळे नागोठणे प्रा. आ. केंद्रासमोरील तो खड्डा बुजविण्यासाठी महामार्ग खाते अपघाताची वाट पाहतेय का? असा प्रश्न उपस्थित करून या खड्ड्यासह येथील दुसऱ्या खड्ड्यांची तसेच उखडलेल्या साईड पट्टीची तातडीने डागडुजी करावी अशी अशी मागणी वाहनचालक तसेच सामाजिक कार्यकर्ते अजित दळवी यांनी केली आहे.

वडखळ, नागोठणे, सुकेळी खिंड ते कोलाड या अंतरातील रस्त्याची अवस्था तर आजही भयानक आहे. आलटून पालटून सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाने या रस्त्याच्या पूर्णत्वाच्या बाबतीत केलेली सर्व आश्वासने आजपर्यंत हवेतच विरून गेली आहेत. असाच काहिसा प्रकार राष्ट्रीय महामार्गाच्या लगतच असलेल्या नागोठण्यातील प्रा.आ.केंद्राच्या समोरील रस्त्याच्या बाबतीत दिसून येत आहे. येथील पेव्हर ब्लॉक निघाल्याने एक जीवघेणा खड्डा तयार झाला आहे. तसेच याच ठिकाणी इतर अनेक छोटे खड्डे तयार झाले असून नागोठण्यात येण्यासाठी असलेल्या रस्त्याची साईड पट्टी पूर्णतः निघाली आहे. यामुळे या ठिकाणी शंभर मिटरच्या अंतरातील रस्ता अंत्यंत धोकादायक बनला आहे. या ठिकाणी असलेला हा खड्डा चुकवायला गेल्यास एकतर रस्त्याखाली जायची भिती अथवा मागून येणाऱ्या वाहनाने धडक देण्याची भिती निर्माण झाल्याने येथे अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. आज ज्या ज्या ठिकाणी हे पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत तेथील परिस्थिती भयानक आहे. त्यामुळे हे खड्डे व साईड पट्टी तातडीने बुजविण्याची गरज निर्माण झाली आहे.

पनवेलमध्ये टँकरने पाणीपुरवठा

। पनवेल । प्रतिनिधी ।

सध्याच्या उन्हाळ्यामध्ये पनवेल तालुक्यातील टंचाईग्रस्त गाव, वाडी, वस्तीस टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तालुक्यातील तेरा गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती पंचायत समिती पनवेल तर्फे देण्यात आली आहे.

मे महिना उजाडून १४ दिवस होऊन गेले आहेत. यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र जाणवू लागलेला आहे. उन्हामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. अंगाची काहिली होत आहे. अनेक जण दुपारचा प्रवास टाळत आहेत, मात्र तरी देखील उष्णता कमी होताना दिसून येत नाही. सूर्यदेव आग ओकू लागलेला आहे. त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवू लागली आहे. पनवेल तालुक्यात आणि शहरात पाणीटंचाई दिवसेंदिवस अधिक जाणवू लागली आहे. त्यामुळे पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहन प्रशासन करत आहेत. विहिरीतील पाणी, बोरवेल मधील पाणी खोल गेलेले आहे. अनेक ठिकाणच्या विहिरींनी तळ गाठलेला पाहायला मिळतो. नद्या देखील आटल्या आहेत. त्यामुळे दूषित पाणी प्यावयास लागते . तर काही ठिकाणी पाण्याचा सर्रासपणे अतिवापर केला जात आहे. याकडे ग्रामपंचायत ने लक्ष घालणे गरजेचे आहे.

तालुक्यातील माडभुवन, कसळखंड, आष्टे, फणसवाडी, शिवाजीनगर, आरीवली, हाल टेपवाडी, ताराटेप, घेरावाडी, कोरळ, गावदेवी आदिवासीवाडी, शिरढोण, शिरढोण पाडा या तेरा गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. यासाठी पाच टँकर उपलब्ध करण्यात आले आहेत. १२ हजार लिटरचे पाच टँकर द्वारे या १३ गावांना पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती पंचायत समिती, पनवेल यांच्यातर्फे देण्यात आली.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **शेती, वाडीत, बंगला व सोसायटीमध्ये रिंगाची** विहीर करुन घेण्यासाठी संपर्क : रणजित पाटील, सम्राट प्लेटस् ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७
- **अलिबागमध्ये १** फ्लॅट भाड्याने पाहिजे. संपर्क ८९७५९९३९२९ एजंन्ट क्षमस्व.
- **अलिबाग नगरपालिका हद्दीतील अलिबाग** वरसोली हमरस्त्यावरील गर्गवरद हौ.सो.मधील रो हाऊस, प्रायव्हेट पार्किंग सोयी सहीत विकणे आहे. अेरीया १६०० square फुट संपर्क ९३२४९८३७८५/९४२३८९०२०१ Atul Haslani
- **पुण्यात डॉक्टरचे घरी कामासाठी** राहणारी मुलगी/बाई पाहिजे जेवणा खाण्यासहीत पगार रू. १०,०००/- संपर्क- ९४२२४३००२१, ७७५७८३४५२७, ८६००११२५०२.
- **ड्रायव्हर पाहिजे.** संपर्क : ८७८८०२१५१०
- **अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे** पाहिजे. Reception-Housekeeping-waiter-Helfer-cook etc. Phone-8208459424, 9323152990. email-csskshirishkar@gmail.com
- **नामांकित कंपनीमध्ये** टॅली, एक्सेलवर व जीएसटीची कामे करणारा अनुभवी अकाऊटंट आणि वॉचमन या पदासाठी प्रत्येकी एक उमेदवार पाहिजे मो.९९२२९०९९७१
- **अलिबागपासून सुमारे नऊ किलोमीटरवर** वढाव खुर्द येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन विकणे आहे. भरपूर पाणी व बांधकाम परवानगी उपलब्ध. संपर्क : सुबोध ७२७६५९१३०२
- **फ्लॅट विकणे आहे.** दुर्वांकूर बिल्डींग अलिबाग बाजारपेठ sqft 781 2nd FL Ph 9975789376
- **शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी पाहिजेत : कामकाजाचे ठिकाण : अलिबाग, पुरुष उमेदवारांना संधी** BA, MA, B.Ed अथवा HSC, D.Ed वय : ३५ पेक्षा कमी, उत्तम संभाषण कौशल्य असल्यास प्राधान्य. Phone : 9822095803, Email : honestefforts1012@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

बीजप्रक्रिया कार्यक्रमाचे आयोजन

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यामध्ये बीज प्रक्रिया मोहीम लोक सहभागातून विनाअनुदान तत्वावर राबविण्यात येणार असून बियाणे बदल कमी असलेला भात पिकामधे शेतकऱ्याकडील स्वतःचे बियाणे वापराचे प्रमाण जास्त आहे. अशा बियाणावर जमिनीतून व बियांणाद्वारे होणार्या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा पीक संरक्षणावरील खर्चात वाढ होते परिणामी उत्पादन खर्च वाढतो त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. त्यामुळे बियाण्यावरती बिज प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे यामुळेच कृषी विभागामार्फत तळा तालुक्यातील सर्व गावामध्ये बिज प्रक्रिया प्रात्यक्षिक मोहीम राबवण्यात येत आहे

बीजप्रक्रिया मोहिमे अंतर्गत शेतकऱ्यांना स्वतः कडील मागील वर्षाचे घरगूती वापरात येणाऱ्या बियाणास बीजप्रक्रिया करण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भात बियाण्यास बीजप्रक्रिया व जीवाणू खताची बीजप्रक्रिया याचा त्यात समावेश आहे.

या मोहिमेअंतर्गतच तालुक्यातील मौजे रोवळा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास सर्व प्रथम कृषी सहाय्यक गोविंद पाशीमे यांनी बीज प्रक्रिया मोहिमेचे प्रास्तविक केले, तर तालुका कृषी अधिकारी अनंत कांबळे यांनी बीजप्रक्रिया फायदे सांगितले. गोविंद पाशीमे यांनी आत्मा योजने अंतर्गत पौष्टिक तृणधान्य प्रात्यक्षिक अंतर्गत राळा, वरी व सावा या पिकाचे बियाणे उपलब्ध झाले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी अनंत कांबळे, कृषी पर्यवेक्षक सचिन जाधव, कृषी सहाय्यक गोविंद पाशीमे, व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सीलबंद पाण्याला मागणी

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रणरणत्या उन्हामध्ये अंगाची लाही होत असतानानागरिक स्वतःच्या आरोग्याची खबरदारी घेतांना दिसू लागले आहेत. यामुळे या उन्हाळ्यामध्ये आपली तृष्णा शांत करण्यासाठी सील बंद पाणी घेण्याकडे अनेकांचा कल वाढला आहे.

पूर्वी प्रत्येक ठिकाणी वाटसरुची तहान भागविण्यासाठी पाणपोई उपलब्ध असायची, मात्र आता आरोग्याचा विचार करुन प्रत्येक जण सील बंद पाण्याचा वापर करीत असल्यांचे दृश्य अनेक ठीकाणी पहावयास मिळत आहे. पानटपरी, हॉटेल, किराणा दुकान, लहान व्यावसायीक यांच्याकडे सील बंद पाणी सहजपणे उपलब्ध होत असल्याने नागरिकांची तहान भागविण्याला त्यातून मदत होत आहे. शहरात पूर्वी एसटी स्थानक, रेल्वे स्थानक, सामान्य रूग्णालय परिसरात, उन्हाळ्याच्या दिवसात पाणपोई लावून समाजसेवा मोठया प्रमाणात केली जात असल्याचा इतिहास आहे. ही परंपरा आजही तुरळक ठिकाणी निभावली जात आहे.

छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत शहरातील छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे संभाजी महाराज यांची जयंती १४ मे रोजी कर्जत शहरातील मुद्रे नाना मास्तर नगर येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे करण्यात आली. यावेळी महाराजांना अभिवादन करण्यासाठीं शेकडो तरुण आणि शिवप्रेमी उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन केल्यानंतर सर्व शिवप्रेमी हे रेल्वे स्टेशन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी बाईक रॅली काठण्यात आली. कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर दहिवली येथे असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौक येथे प्रतिमा पूजन करून छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी नगरसेवक कृष्ण घाडगे, ज्ञानेश्वर भालिवडे, राजेश लाड, अनिल भोसले, बाळू तवले, शंकर थोरवे, रोहिदास लोभी, भगवान धुळे, राजु बांदल, विशाल माळी, तिर्थेश शिंदे, शाकिब खान, धनंजय ठाकरे, श्रीकांत आगिवले आदी मान्यवर उपस्थित होते.

अवकाळीमुळे शेतकरी धास्तावले

उन्हाळी भातपिकाला धोका

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी परिसरात भात कापणीचे काम सुरू झाली आहेत. यंदा दुबार भाताचे पीक चांगले आल्याने शेतकरी आनंदात आहे. मात्र मंगळवारी (ता. २) परिसरात पावसाच्या सरी कोसळल्याने शेतकऱ्यांची काळजी वाढली. खराब हवामान, अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास वाया जाईल, या भीतीने शेतकरी धास्तावले असून कापणी केलेला भात भिजू नये, म्हणून खबरदारी घेत आहे.

नदी काठच्या गावातील शेतकऱ्यांना पाताळगंगा आणि रिस नदीच्या पाण्याचा, वासांबे- मोहोपाडा येथे एमआयडीसीच्या जलशुद्धीकरण केंद्रांमधून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याचा याशिवाय जांभिवलीतील शेतकऱ्यांना माणिक गडाच्या पायथ्याशी असलेल्या बामणोली धरणाच्या पाण्याचा आधार आहे. रसायनी पाताळगंगा परिसरातील सिंचनाचा आधार असलेले शेतकरी दुबार भात आणि भाजीपाल्याचे पीक घेत आहे. यंदाच्या हंगामात परिसरातील शेतकऱ्यांची भात लावणीची कामे फेब्रुवारी महिन्यात पहिल्या आठवड्यात वेळेत पूर्ण झाली. सुरुवातीला पेरणी, रोपांची वाढ आणि त्यानंतर लावणीसाठी दीड-दोन महिने अनुकूल आणि पोषक वातावरण असल्याने पिकाची वाढ चांगली झाली असून काही ठिकाणी कापणीही सुरू करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात रसायनी परिसरात पावसाच्या हलक्या सरी पडल्या होत्या, तसेच वासांबे मोहोपाडामध्ये सकाळी हलक्या सरी पडल्या. पावसामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही, मात्र शेतकऱ्यांची तसेच वीट व्यावसायिकांची तारांबळ उडाली. सध्या तापमान वाढले असून ढगाळ वातावरणामुळे उष्माही वाढला आहे. त्यातच अधूनमधून पाऊस येत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

शेकापमुळे गावांच्या विकासात भर

तालुका चिटणीस रमेश मोरे यांचे प्रतिपादन

। माणगाव । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्ष हा विकासकामांवर भर देणारा पक्ष असून, पळसप ग्रामपंचायतीत गेल्या पाच वर्षात आपण दोन कोटी रुपयांची विकासकामे करण्यात यशस्वी झालो, असे प्रतिपादन माणगाव तालुका शेकाप तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी पळस्पे येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

माणगाव तालुक्यातील मोर्बा जिल्हा परिषद गटातील ग्रामविकास मंडळ पळसप यांच्यावतीने कालभैरव मंदिरात श्री सत्यनारायणाची महापूजा शनिवार, दि. १३ मे रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्त रमेश मोरे यांनी पळसप गावाला भेट देऊन कालभैरव मातेचे दर्शन घेतले. यावेळी रमेश मोरे यांच्यासह शेकापचे ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, रायगड भूषण मधुकर अर्बन यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, शेकाप हा विकासकामांवर भर देणारा पक्ष आहे. आरती मोरे यांना आपण सर्वांनी निवडून दिल्यावर मोर्बा जिल्हा परिषद गटात गेल्या पाच वर्षात आपण शेकापमार्फत १७ ते १८ कोटी रुपयांची कामे करण्यात यशस्वी झालो.

पळसप गावाकडे येणारा रस्ता आपण शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, ज्येष्ठ नेते अस्लम राऊत यांच्या कृपाशीर्वादाने केला. या एका ग्रामपंचायतीत आपण गेल्या ५ वर्षात २ कोटी रुपयांची कामे करण्यात यशस्वी झालो. पळसप ग्रामस्थ व रमेश मोरे यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाल्याचे मोरे म्हणाले. या कार्यक्रमास ग्रामविकास मंडळ पळसपचे ग्रामस्थ व मुंबईकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'शासन आपल्या दारी' अंतर्गत प्रबोधन

। खांब-रोहा । वार्ताहर ।

शासन आपल्या दारी अंतर्गत शिधा पत्रिकाधारकांना प्रबोधनात्मक कार्यक्रम रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथे मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

रायगड जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे, तहसिलदार डॉ. किशोर देशमुख, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी पुरवठा निरीक्षण अधिकारी उज्ज्वला अंधेरे, अभिजित महाडिक, गोदाम व्यवस्थापक दर्शना पाटील, महसूल सहाय्यक पूजा जोशी, प्रविण दवटे, गिरिश मढवी, सरपंच रविंद्र मरवडे, उपसरपंच संदिप महाडिक, माजी सरपंच राम मरवडे,वसंत मरवडे,सदस्य दयाराम मरवडे,हरिश्चंद्र मांगुळकर, निलिमा वाळंज,खेळू मरवडे, नामदेव मरवडे,नंदू मरवडे,नाना शिंदे,सुरेश मरवडे, पांडुरंग नागावकर, सुरेश वाघमारे, प्रशांत नागावकर, ठमाजी महाडिक, तुकाराम बामणे, अनंता लोखंडे, ग्रा.वि.अधिकारी सौ. पिंपळकर, सुभाष बामणे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमप्रसंगी जीर्ण झालेले रेशनिंग कार्ड, नावातील बदल अथवा नाव कमी करणे, कार्डमधील त्रुटी तसेच अन्य नोंदी याबाबतची कार्यवाही कार्यक्रमातंर्गत करण्यात आली. तसेच पुरवठा निरीक्षण अधिकारी उज्ज्वला अंधेरे यांनी शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट करून रेशनकार्ड बाबत उपस्थितीतांना सुयोग्य मार्गदर्शन केले. शेवटी सरपंच रविंद्र मरवडे यांनी उपस्थितीतांचे आभार व्यक्त करून व शासन आपल्या दारी या शासकीय उपक्रमाचे कौतुक करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सिमेंट भरलेल्या ट्रकची संरक्षण भिंतीला धडक

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सोलापूर येथून सिमेंटने भरलेला ट्रक क्रमांक के.ए.२८ ए.ए.३५९६ हा मुरुडकडे जात असताना गारंबी वळणावर चालकाला रस्त्याचा अंदाज न आल्याने ट्रकने संरक्षण भिंतीला धडक दिली.

मुरूड राजपुरी या ठिकाणी जेट्टीच्या बांधकाम करिता सिमेंटचे भरलेले ट्रक सोलापूर याठिकाणी वरून मागविण्यात आला होता. तोच ट्रक याठिकाणी येत असताना गारंबीच्या वळणावर गाडीला वळण बसत नसल्याने शेवटी चालकांनी गाडी मागे नेण्याचा प्रयत्न केला परंतु गाडीचे पाठीमागचे टायर जाग्यावर फिरत असल्याने गाडी पलटी होण्याचा संभव असल्याने पुन्हा गाडी पुढे नेण्याचा प्रयत्न करत असताना गाडीचा ब्रेक पटकन न लागल्याने संरक्षण भिंतीला धडक बसली. चालकांनी हुशारीने गाडीचे ब्रेक दाबल्याने गाडी जाग्यावर थांबली. ताबडतोब गाडीमधील असणाऱ्या दोन जणांना उतरविण्यात आले. गाडीचा ब्रेक लागला नसता तर १०० फुट गाडी खाली पडुन मोठा अपघात झाला असता.

रोहा वरुन मुरुडला येण्यासाठी केळघर मार्गे जात असल्याने रस्त्यावरून पर्यटकासह शेकडो गाड्या येजा करीत असतात. याच रस्त्यावर मोठा ट्रक वळणावर अडकल्याने या ठिकाणी वाहतुकीला अडथळा येऊ लागला.

स्थानिकांची व ट्रकच्या मालकांच्या साह्याने याठिकाणी मोठी क्रेन मागविण्यात आली. क्रेनच्या साह्याने सिमेंट ट्रकला बाजूला करण्यात आले आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली.

मुरुड व पंचक्रोशीभागातील बांधकाम ठेकेदारांनी आपल्या बांधकामाकरिता सिमेंट, लोखंड, लादी व इतर बांधकाम वस्तू बाहेरच्या जिल्ह्यांतुन मागविताना गारंबी-केळघर रस्त्यावरून न येण्याच्या सुचना तेथील चालकाला व मालकांना द्याव्यात जेणेकरून याठिकाणीच्या रस्त्यावर रहदारी व होणारा अपघात टाळता येईल. असे आवाहन मुरुड पोलीस ठाण्याचे प्रकाश सकपाळ यांनी केले.

आपत्तीच्या काळात प्रशासनाशी संपर्क साधा : पाटील

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील ग्रामस्थांनी आपत्तीच्या काळात जिल्हा प्रशासनाने कार्यरत ठेवलेल्या सर्व यंत्रणांचा लाभ घ्यावा इतरांनाही मदत करावी, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुधाकर घारे यांनी केले. आपत्ती सुरक्षा प्रशिक्षणाचे शिबिराचे उद्घाटन सुधाकर घारे यांच्या हस्ते झाले. तर, आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ जयपाल पाटील यांनी आपत्तीच्या वेळी नागरिकांनी कोणताही विचार न करता तात्काळ तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले.

कर्जत तालुक्यातील खांडपे येथे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित शिबिराला मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग उपस्थित होता. त्याप्रसंगी ग्रामपंचायत सरपंच नमिता घारे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, ग्राम विकास अधिकारी राजेंद्र डोंगरे, लेखक गोपाळ शेळके, योग शिक्षिका दीपा घेवारे आदी मान्यवर उपस्थित होते.

सरपंच नमिता घारे यांनी प्रास्ताविकात रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या आदेशाने रायगड जिल्ह्यातील ८०४ ग्रामपंचायत नागरिकांना आपत्तीप्रसंगी कसे सामोरे जायचे आणि आपला बचाव आपणच कसा करायचा याची माहिती आपल्या ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांना असावी यासाठी आपत्ती व्यवस्थापन धडे देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पावसाळ्यातील कोणत्याही आपतीच्या काळात कसा मार्ग काढायचा याबाबत मार्गदर्शन करणारे जयपाल पाटील यांचे मार्गदर्शन आयोजित करायला सांगितले होते. त्यानुसार ग्रामस्थांच्या सोयीसाठी हे शिबीर आयोजित केले असल्याची माहिती दिली. जयपाल पाटील यांनी यावेळी माहिती देताना नैसर्गिक आपत्तीच्या वेळी रायगड जिल्हाधिकारी आपत्ती प्राधिकरण प्रांताधिकारी, तहसीलदार आणि समाजसेवी संघटना मदत करीत असतात असे मार्गदर्शन केले. तर यावेळी महिलांवर येणाऱ्या आपत्तीसाठी कायद्याबाबत माहिती ॲड. गोपाळ शेळके यांनी करून दिली. योगा हा प्रत्येकासाठी सर्वांचे आरोग्य सुंदर रहावे त्यासाठी योगशिक्षिका कर्जत येथील दीपा घेवारे यांनी प्रात्यक्षिक व माहिती दिली.

या आपत्ती व्यवस्थापन चे निमित्ताने खांडपे येथून शासकीय यंत्रणा आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यरत आहे काय हे तपासण्यात आले. त्यावेळी कर्जत खांडपे रस्त्यावर अपघात झाल्याचा फोन १०८ रुग्णवाहिका यांना दिली असता काही २० मिनिटात रुग्णवाहिका डॉक्टरसहित पोहचली. बाळंतपणाबद्दल माहिती दिल्यावर मोहीली प्राथमिक आरोग्य केंद्रात फोन केल्यावर १५ मिनिटात महिला डॉक्टर सह तेथे रुग्णवाहिका पोहचली होती. तर खांडपे गावात आग लागली असल्याचा फोन कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी यांना करण्यात आला, त्यानंतर काही वेळातच अग्निशमन यंत्रणा गाडी तेथे कर्जत येथून पोहोचली होती.

देवन्हावेमध्ये गतिरोधकाची मागणी

। खोपोली । वार्ताहर ।

खोपोली-पाली रस्त्याचे रूंदीकरण करीत काँक्रीटीकरणामुळे रस्ता सुसाट झाला आहे. कोकणाकडे तसेच ॲडलॅब इमॅजिकाकडे जाणाऱ्या वाहनांची मोठी गर्दी असते.

देवन्हावे गाव रस्त्याच्या दोन्हीही दुतर्फा असल्यामुळे कामासाठी महिला, अबालवृध्द तसेच शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. सुसाट रस्त्यावर गतिरोधकच नसल्याने भरधाव येणाऱ्या वाहनांच्या भितीने रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. भविष्यात मोठा अपघात टाळण्यासाठी देवन्हावे गाव परिसरात तातडीने गतिरोधक बसवा अशी मागणी ॲड. जयेश तावडे यांनी केली आहे.

देवन्हावे गावातून जाणाऱ्या रस्त्यावर गतीरोधक नसल्याने पादचारी, शालेय विद्यार्थी, वाहन चालक व प्रवाशांचा आपला जीव मुठीत घेऊन रस्ता पार करावा लागत असल्याचे पाहायला मिळत असताना अनेकांनी नाराजी व्यक्त करित याठिकाणी लवकरात लवकर संबंधित प्रशासनाने गतीरोधक टाकावे अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

छ. संभाजी महाराज यांना अभिवादन

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत नगरपरिषदेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, यावेळी रविंद्र लाड, निकेश फाळे, गोपाळ शेलार उपस्थित होते.

निजामपुरात मारहाण गुन्हा दाखल

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव तालुक्यातील निजामपूर येथे संत रोहिदास नगरात एकाला मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिल्याने आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना दि. १३ मे २०२३ रोजी सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत निशांत सत्यवान चांदोरकर (वय-२२) रा. संत रोहिदास नगर निजामपूर ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. सदर घटनेबाबत माणगाव सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि, घटनेतील फिर्यादी निशांत सत्यवान चांदोरकर व आरोपी सुंदर तुकाराम गोरेगावकर, सुमेद सुंदर गोरेगावकर, सुमन सुंदर गोरेगावकर, बबल्या सावल्या गोरेगावकर सर्व रा. संत रोहिदास नगर निजामपूर ता. माणगाव हे एकाच गावातील राहणारे आहेत. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार तुणतुणे हे करीत आहेत.

के.एम.सी कॉलेजच्या गर्स बटालियनला पारितोषिक

। खोपोली । प्रतिनिधी ।

विद्येचे मंदिरातून व्यसनमुक्तीचे धडे देण्यासाठी खोपोली टाटा मेमोरियल सेंटर आणि ५ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन मुंबई ग्रूप -अ. प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी सर्व्हिसेस यांच्या वतीने जागतिक तंबाखू विरोधी दिवस या पोस्टर, रांगोळी स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा घेण्यात आले होते. स्पर्धांचा बक्षिस समारंभ बुधवार दि.१० मे रोजी कॉलेजच्या सभागृहात केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष संजय पाटील, कार्यवाहक किशोर पाटील, राजू अभानी, दिनेश गुरव, प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, शितल गायकवाड, दिनेश मुसळे उपस्थित होते.

राजेंद्र पवार यांचे निधन

। अलिबाग । वार्ताहर ।

श्री शिवशक्ती सो.रामनाथ- अलिबाग येथील राहिवाशी राजेंद्र दत्तात्रय पवार यांचे शुक्रवार (दि.१२) रोजी मध्यरात्री १.१० वा. ६६व्या वर्षी निधन झाले.

त्यांचा दशक्रिया विधी दि.२१ मे रोजी वरसोली येथील स्मशानभूमीत होणार आहेत. पवार यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय येथे ३६ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले होते. अलिबाग- रामनाथ येथील संतोष नागावकर यांचे सासरे असून विनायक राजेंद्र पवार यांचे वडील आहेत. त्यांच्या मागे पत्नी राधिका राजेंद्र पवार, मुलगा विनायक राजेंद्र पवार, मुलगी सानिका(रुपाली)संतोष नागावकर, नातेवाईक/आप्तेष्ट असा परिवार आहे.

मंगळवारी भैरी जोगेश्वरी मंदिराचा सोहळा

। महाड । प्रतिनिधी ।

रायगड विभागातील तळोशी गावच्या आई रंगूमाता मंदिरामध्ये मंगळवार, १६ मे रोजी भैरी जोगेश्वरी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती ग्रामस्थ महिला मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. आई रंगुमाता मंदिरामध्ये होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील नागरिकांनी या सोहळ्या उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे-सावळे, तालुका- कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१) अमिता रामचंद्र बहुतुले २) श्री. रामचंद्र भास्कर बहुतुले	८	४अ	०-४३-००	०.३७

सदरच्या जमिन मिळकत या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्गंभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - कर्जत
दि. १५-०५-२०२३

खरेदीदारातर्फे वकील
ॲड. स्वप्निल बाबूराव देशमुख
ऑफीस पत्ता- शॉप नं. २४, मार्वल, क्षिप्रा रेसिडेन्सी, मुर्द्रे बुद्रुक
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १, जुड मार्क फर्नांडिस आणि २. अन्न जुड फर्नांडिस, यांनी खाली नमुद केलेल्या मिळकतीचे मालक बंडु बबन तुरडे, यांचेकडून खालील वर्णनाची जमिन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे-माणगावतर्फे वासरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड

गाव	सर्व्हे नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
माणगावतर्फे वासरे	२/५	०-११-१० पो.ख. ०-०१-३० एकूण :०-१२-४०	०.१६

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

कर्जत, दि. १५-०५-२०२३

ॲड. संदीप मारुती घरत
ऑफीस :-श्री साई सावली, सो.लि.तळमजला, शॉप नं. २
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड,
पिन-४१०२०१. मो. ९२२०६५३३०२/ ८४४६७२४९८८

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांनी मौजे-कवठेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड येथील मिळकती, त्या मिळकतींचे मालक १.श्री. हरी दामा उर्फ रामा कवठे, २.श्री. काशिनाथ वाळकू कवठे, ३.श्री. रघुनाथ वाळकू कवठे, ४. श्री. बाळू वाळकू कवठे, ५. श्री. ज्ञानेश्वर रामू कवठे, ६. श्री. अनिल रामू कवठे, ७. श्रीमती हिराबाई रामू कवठे, ८.श्री. देहू लखू कवठे, ९.श्री. संतोष दामू कवठे, १०.श्रीमती द्वारकीबाई रामू कवठे, ११. श्रीमती राधाबाई राघो पादीर, १२. श्रीमती कुसूम लक्ष्मण केवारी यांच्याकडून कायम साठेखताने व इतर आवश्यक दस्तांची पुर्तता करुन घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार रु.पै.
३४	१/ब	०-२४.८०	०.५९

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमिन मालकांशी बोलणी केलेली आहे तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमिन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- कर्जत
दि. १५-०६-२०२२

वकील
ॲड. सचिन संजय सुर्वे
पत्ता : नाथसदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि.रायगड, ४१०२०१
मो.नं.९०२८५४६१५७/
७३८५५४६१५७

Required Teaching Staff

PNP Education Society is one of the leading education society working since 2001. For our various English medium schools (affiliated to CBSE and State Board) located at Nagaon, Sambari(Kurdus), Veshvi, Vavoshi and Khalapur we require Principals and teachers.

Qualification - As per the norms.

Pay scale - For the post of the Principals Rs. 50,000/- to 1,00,000/-

For the post of the teachers Rs. 15,000/- to 40,000/-

Note : Pay scale depends on the qualification, experience, teaching skills and previous CTC.

For more details please contact

Amit Deshpande : 9673766347, Shruti Sutar : 9673371587

Rajashree Patil : 9892150116

Please mail your CV on

pnp.ajd@gmail.com / shrutisutar154@gmail.com
pnp.rajashree@gmail.com / pnpedusoc@gmail.com

Note : Fluency in English is a must

निवडक

स्ट्रीकची मृत्यूशी झुंज

नवी दिल्ली : झिम्बाब्वे क्रिकेट संघाचा माजी कर्णधार हीथ स्ट्रीक हा मृत्युशी झुंज देत आहे. ४९ वर्षीय हीथ स्ट्रीकला यकृताचा कर्करोग झाला असून, तो चौथ्या टप्प्यात पोहोचला असल्याचं कळतं. त्याची प्रकृती अतिशय गंभीर असून, तो सध्या जोहान्सबर्ग येथील रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती मिळत आहे. त्याचे कुटुंब लंडनहून त्याच्याजवळ पोहोचले आहे. हीथ स्ट्रीकला कर्करोगाने ग्रासल्याचं वृत्त समोर आल्यानंतर त्याच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना केल्या जात आहेत.

अमित मिश्राला फटकारले

मुंबई : हैदराबाद आणि लखनऊमधील सामन्यादरम्यान आक्रमक सेलिब्रेशन केल्याबद्दल सामनाधिकाऱ्यांनी लेगस्पिनर गोलंदाज अमित मिश्राला फटकारले. त्याने नवव्या षटकातील पाचव्या चेंडूवर अनमोलप्रीत सिंगचा झेल टिपला आणि आक्रमकतेने चेंडू जमिनीवर आपटला. ही कृती आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन असल्याचे सामनाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. याबद्दल अमित मिश्राने दिलगिरी व्यक्त केली आहे.

गेलच्या अडचणी वाढल्या

मुंबई : परवानगी न घेता वेस्ट इंडिजचा माजी फलंदाज ख्रिस गेल याने समुद्रात जाऊन २७ एप्रिल रोजी चित्रीकरण केले होते. मात्र, मुंबई पोर्ट ट्रस्टकडून कुठलीही कारवाई झाली नव्हती. मात्र आता ख्रिस गेलच्या समुद्रात चित्रिकरण झालेली जाहिरात प्रदर्शित होताच, मुंबई पोर्ट ट्रस्टकडून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरु झाली आहे. हे चित्रिकरण करणाऱ्या कंपनीवर लवकरचं गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. आयपीएल सामन्यांचे समालोचन करण्यासाठी जगभरातील अनेक आजी-माजी क्रिकेटपटू सध्या भारतात आहेत.

शफालीचे उत्तम यश

मुंबई : भारतीचा युवा महिला क्रिकेटपटू शफाली वर्मा गेल्या काही वर्षापासून क्रिकेटचं मैदान गाजवण्यात अग्रेसर आहे. तिच्या नेतृत्वाखाली १९ वर्षाखालील भारतीय महिला संघाने पहिला वर्ल्डकप जिंकण्याचा पराक्रमदेखील केला आहे. क्रिकेटचं मैदान लिलया गाजवणाऱ्या शफालीने सीबीएसएसी बोर्डाच्या १२ वीच्या परीक्षेतदेखील छप्पर फाडके गुण मिळवले आहेत. तिने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून हे वेळापत्रक तयार करुन तिने बारावीमध्ये ८० टक्के गुण मिळविल्याचे सांगितले आहे.

बीसीसीआयला नोटीस

नवी दिल्ली : भारतीय क्रीडा जगतात सध्या भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर भारताच्या महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषण केल्याचे आरोप केले आहेत. या प्रकरणात आता राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने उडी घेतली आहे. त्यांनी देशातील अनेक क्रीडा संघटनांना लैंगिक शोषण विरोधी कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीस पाठवली आहे. यात भारतीय क्रिकेट बोर्ड, स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया यासह युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाचादेखील समावेश आहे.

दिल्लीने गाशा गुंडाळला

। मुंबई । प्रतिनिधी । पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामन्यात पंजाबने दिल्लीचा ३१ धावांनी पराभव केला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दोन्ही संघ आमनेसामने आले होते. कॅपिटल्सचा कर्णधार डेव्हिड वॉर्नरने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पंजाबने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सात गडी गमावून १६७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ २० षटकांत ८ गडी गमावून १३६ धावाच करू शकला.

पंजाबची ३१ धावांनी मात

नाणेफेक हरल्यानंतर पंजाबसाठी सुरुवात खास नव्हती. कर्णधार शिखर धवन पहिल्याच षटकातच इशांत शर्माचा बळी ठरला. यानंतर लियाम लिव्हिंगस्टोनही स्वस्तात बाद झाला. पण सलामीला उतरलेला प्रभसिमरन सिंग १९ व्या षटकापर्यंत क्रीझवर राहिला. त्याने ६५ चेंडूंत १०३ धावांची शानदार खेळी केली आणि आयपीएलमधील पहिले शतक झळकावले. त्याच्या खेळीमुळे पंजाब किंग्जने २० षटकांत ७ गडी गमावून १६७धावा केल्या होत्या.

प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्सला डेव्हिड वॉर्नर आणि फिल सॉल्टने शानदार सुरुवात करून दिली. काही काळ दिल्ली हा सामना एकतर्फी जिंकेल असे वाटत होते. वॉर्नरनेही अर्धशतक झळकावले. पण हरप्रीत ब्रारने चार बळी घेत दिल्लीच्या सर्व आशा धुळीस मिळवल्या. त्यामुळे दिल्लीचा संघ पात्रता फेरी शर्यतीतून बाहेर पडला आहे. दिल्लीच्या संघाला निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून केवळ १३६ धावा करता आल्या.

पंजाबला अद्याप प्लेऑफच्या आशा

दिल्लीचा संघ या पराभवानंतरही शेवटच्या स्थानावर आहे. त्यांना १२ व्या सामन्यात आठव्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. त्याचबरोबर दिल्लीच्या पुढच्या फेरीत जाण्याच्या सर्व आशाही संपल्या आहेत. दुसरीकडे, पंजाब किंग्सने शर्यतीत स्वतःला कायम ठेवले आहे. पंजाबचा बाराव्या सामन्यातील हा सहावा विजय ठरला. गुणतालिकेत संघ १२ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. तरीही संघाने उर्वरित दोन्ही सामने जिंकले आणि धावगती चांगली राहिल्यास अंतिम-४ मध्ये जाण्यास त्याच्या आशा कायम राहतील.

कर्णधार असताना अनेक चुका केल्या : कोहली

। नवी दिल्ली ।- वृत्तसंस्था ।

टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहली अलिकडेच एका मुलाखतीत म्हणाला, 'मी कर्णधार असताना माझ्याकडून अनेक चुका झाल्या हे मान्य करायला मला लाज वाटत नाही, पण मला एक गोष्ट माहीत आहे की, मी माझ्या स्वार्थासाठी कधीच काही केले नाही. संघाला पुढे नेण्याचे माझे लक्ष्य होते.

डिस्ने + हॉटस्टार शो 'लेट देअर बी स्पोर्ट' च्या एका एपिसोडमध्ये कोहली पुढे म्हणाला, 'मी असे म्हणू शकतो की, जसे तुम्ही तुम्ही चुका करून आऊट होता ते अपयश असते.

अडचणी आल्या, पण माझा हेतू चुकीचा नव्हता. जोपर्यंत तुम्ही योग्य ठिकाणी असाल, तोपर्यंत तुम्ही चुका कराल, पण जेव्हा तुम्ही त्यांच्याकडून शिकाल तेव्हा तुम्ही चमकू लागाल.'

नागशेत कबड्डी स्पर्धेत रासळ एन विजयी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

श्री भैरवनाथ क्रीडा मंडळ नागशेत यांच्या विद्यमाने सुधागड तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार, दि. १३ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील अंतिम लढत जय हनुमान रासळ एन विरुद्ध जय हनुमान रासळ आर या दोन संघात झाली. त्यामध्ये रासळ एन हा संघ विजयी झाला.

विजेत्या संघास रोख १५ हजार व चषक, तर उपविजेतेपदाचा मानकरी रासळ आर या संघास रोख ११ हजार व चषक, तृतीय क्रमांक वरदायिनी राबगाव संघास रोख सात हजार पाचशे व चषक, चतुर्थ क्रमांक हनुमान क्रीडा मंडळ मजरे जांभुळपाडा या संघास रोख सात हजार पाचशे व चषक देऊन मंडळाच्या वतीने गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू अथर्व खाडे (रासळ), उत्कृष्ट चढाई प्रणय तेलंगे (रासळ), उत्कृष्ट पक्कड नागेश साजेकर (मजरे जांभुळपाडा), पब्लिक हिरो अजिंक्य मोरे या खेळाडूंना प्रत्येकी कूलर व चषक देऊन गौरविण्यात आले.

पनवेल येथे क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे विभाग प्रमुख चषक २०२३ च्या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या उपस्थितीत व ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांच्या साथीने करण्यात आले. यावेळी सर्व संघांना तसेच आयोजक प्रशांत नरसाळे व त्यांच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्यासह ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, तालुका प्रमुख संदीप तांडेल, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगर समन्वयक दिपक घरत, उपमहानगर प्रमुख अच्युत मनोरे, कैलास पाटील, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, कळंबोली शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, नवीन पनवेल शहर प्रमुख यतीन देशमुख, उपजिल्हा युवासेना अधिकारी अवचित राऊत, अरुण ठाकूर आदींसह इतर पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडी व युवासेना मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कबड्डी स्पर्धेत उपांत्य फेरीत चुरस

। मुंबई । प्रतिनिधी ।

गोलफादेवी प्रतिष्ठान, महर्षी दयानंद, शिवशक्ती, चंद्रोदय यांनी मुंबई शहर कबड्डी असो. आणि गोलफादेवी सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या १४ वर्षाखालील मुलींच्या उपांत्य फेरीत धडक दिली. अमर संदेश, चंद्रोदय, समर्थ स्पोर्टस् यांनी मुलांच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. वरळीगाव येथील गोलफादेवी मंडळाच्या पटांगणावर सुरू असलेल्या मुलींच्या शेवटच्या साखळी सामन्यात गोलफादेवी प्रतिष्ठानने शिवशक्ती महिला संघाला ३६-३६ असे बरोबर रोखत साखळीत ५ गुण मिळवित अग्रस्थान मिळविले. अस्मिताराणी मंडल, आर्या पाटील गोलफादेवी कडून, तर वेदिका केकाणी, राशी कोकाटे शिवशक्ती कडून उत्कृष्ट खेळले.

दुसऱ्या सामन्यात मात्र शिवशक्तीने चंद्रोदय मंडळाला ४५-१९ असे नमवित साखळीत ३ गुण मिळवित तिसऱ्या स्थानी झेप घेतली.

मुलांच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात अमर संदेश स्पोर्टस् ने ओम् पिंपळेश्वर संघाचा ६१-३२ असा पराभव केला. चंद्रोदय मंडळाने अक्षर ठाकूर, आयुष यादव यांच्या चढाई-पकडीच्या जोरावर वीर संताजी मंडळाचा ४९-२६ असा पराभव करीत आगेकूच केली. समर्थ स्पोर्टस् संघाने वीर नेताजीला ७२-५० असे पराभूत करीत तिसरी फेरी गाठली. गौरीदत्त मित्तल संघाने ओम् श्री साईनाथचा ८३-१० असा, तर गोलफादेवी (अ) संघाने श्री क्रीडा मंडळाचा ६९-३२ असा पाडाव करीत तिसरी फेरी गाठली.

नकोलस पूरनचा झंझावात

लखनऊचा हैदराबादवर दणदणीत विजय

। मुंबई । प्रतिनिधी ।

सनरायझर्स हैद्राबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात राजीव गांधी स्टेडियममध्ये रंगला. हैद्राबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या एसआरएचच्या फलंदाजांनी चौफेर फटकेबाजी केली. हेनरिक क्लासेन आणि अब्दुल समदच्या अप्रतिम फलंदाजीमुळं हैद्राबादने २० षटकांत १८२ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर विजयासाठी १८३ धावांचा पाठलाग करणाऱ्या लखनऊ सुपर जायंट्सच्या फलंदाजांनी धमाका केला.

लखनऊची सुरुवात खराब झाल्यानंतरही निकोलस पूरन आणि प्रेरक मंकडने धडाकेबाज फलंदाजी करत लखनऊला विजय मिळवून दिला. मंकडने ४५ चेंडूंत ६४ धावांची नाबाद खेळी केली. तर, पूरनने १३ चेंडूंत ४४ धावांचा पाऊस पाडला. मार्कस स्टॉयनिसनेही २५ चेंडूंत ४० धावांची खेळी साकारली. या धावांच्या जोरावर लखनऊने १८३ धावा करून हैद्राबादवर सात गडी राखून विजय मिळवला. ग्लेन फिलिप्स, मयंक मार्कंडे आणि अभिषेक शर्माला प्रत्येकी एक बळी घेण्यात यश मिळालं.

हैद्राबादसाठी सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा स्वस्तार माघारी परतला. त्यानंतर अनमोल प्रीतने ३६ धावांची खेळी साकारून हैद्राबादच्या धावसंख्येचा आलेख उंचावला. राहुल त्रिपाठीने २० तर कर्णधार एडन मार्करमने २८ धावांची खेळी केली. त्यानंतर हेन्री क्लासेन आणि अब्दुल समदने जबरदस्त भागिदारी करून हैद्राबादची धावसंख्या वाढवली. त्यामुळे २० षटकांत हैद्राबादने सहा बळी गमावत १८२ धावा केल्या. लखनऊ सुपर जायंट्सच्या गोलंदाजांनी भेदक मारा करून हैद्राबादच्या फलंदाजांना गुंडाळलं.

कर्णधार कृणाल पांड्याने एकाच षटकात दोन बळी घेऊन हैद्राबादच्या संघाला मोठा धक्का दिला. पांड्याने मार्करमला २८ धावांवर असताना बाद केलं. त्यानंतर दुसऱ्याच चेंडूवर ग्लेन फिलिप्सचा त्रिफळा उडवला. फिलिप्स शून्यावर बाद झाल्याने हैद्राबादच्या धावसंख्येची गती मंदावली. परंतु, हेन्री क्लासेननं पुन्हा एकदा सावध खेळी करून २९ चेंडूत ४७ धावा कुटल्या. तर अब्दुल समदने २५ चेंडूत ४ षटकार आणि १ चौकराच्या मदतीनं ३७ धावांची नाबाद खेळी केली. लखनऊसाठी कृणाल पांड्याने दोन बळी घेतले. युधवीर चरक, अमित मिश्रा आणि यश ठाकूरला प्रत्येकी एक बळी मिळाला.

पुढील फेरीची शर्यत रंगतदार

दोन संघ बाहेर, आठ संघांची दावेदारी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएलमध्ये दोन संघांचे आव्हान संपुष्टात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गुणतालिकेचे समीकरण अजूनच रंगतदार झाले आहे. पंजाबच्या संघाचे आता १२ गुण झाले आहेत. त्यामुळे आठव्या स्थानावरील पंजाबचा संघ आता सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. गुणतालिकेत पंजाब आणि राजस्थान या दोन्ही संघांचे आता १२ गुण असतील. त्यामुळे पात्रता फेरीचे गणित आता चांगलेच रंगणार आहे. या सामन्यानंतर दिल्लीचा संघ आता स्पर्धेबाहेर गेला आहे.

लखनौने सामन्यात हैदराबादवर विजय साकारला. या सामन्यापूर्वी ११ सामन्यांत त्यांचे ११ गुण होते. पण १२ व्या सामन्यात त्यांनी विजय साकारला आणि त्यांचे आता १३ गुण झाले आहेत. या १३ गुणांसह आता लखनौच्या संघाने राजस्थानला पिछाडीवर ढकलले आहे आणि त्यांनी गुणतालिकेतील चौथे स्थान मिळवले आहे. त्यामुळे ते पात्रता फेरीच्या दिशेने जात असल्याचे आता समोर येत आहे. उर्वरित दोन्ही सामने जर त्यांनी जिंकले, तर ते आता पुढील फेरीमध्ये पोहोचू शकतात. त्यामुळे आता आयपीएलच्या पुढील फेरीसाठी आठ संघांमध्ये शर्यत असेल. दिल्ली कॅपिटल्स आणि त्यांच्याबरोबर सनरायझर्स हैदराबादचा संघ आता आयपीएलच्या बाहेर पडले आहेत.

आयपीएलमध्ये आता पुढील फेरीची शर्यत चांगलीच रंगतदार होत चालली आहे. दोन संघ तर आता या शर्यतीमधून बाहेर पडले आहेत, पण आठ संघांमध्ये आता शर्यत पाहायला मिळेल.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेचा मोठा निर्णय

कुस्ती संघटनेचे सर्व पदाधिकारी अपात्र

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या अटकेच्या मागणीसाठी जंतरमंतरवर बसलेल्या कुस्तीपटूंच्या धरणे आंदोलनाचा आज २१ वा दिवस आहे. दरम्यान, भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) भारतीय कुस्ती महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना अपात्र ठरवले आहे. आयओएचे सहसचिव कल्याण चौबे यांनी कुस्ती संघटनेला आदेश जारी करून सर्व पदाधिकाऱ्यांच्या प्रशासकीय, आर्थिक कामांवर बंदी घातली आहे.

आयओएने कुस्ती असोसिएशनला सर्व दस्तऐवज, खाती आणि परदेशी टूर्नामेंट, वेबसाइट ऑपरेशन्ससाठी प्रवेशासाठी लॉगिन त्वरित सुपूर्द करण्यास सांगितले आहे. क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघाच्या निवडणुका रद्द करून आयओएच्या तात्पुरत्या समितीकडे निवडणुकांचे आयोजन व आयोजन करण्याची जबाबदारी सोपवल्यानंतर आयओएने हे पाऊल उचलले आहे.

४५ दिवसांत निवडणुका

३ मे रोजी, आयओएने कुस्ती संघटना चालवण्यासाठी आणि ४५ दिवसांच्या आत निवडणुका घेण्यासाठी तीन सदस्यीय तात्पुरती समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यात वुशू फेडरेशनचे भूपेंद्र सिंग बाजवा, ऑलिम्पियन नेमबाज सुमा शिरूर आणि निवृत्त न्यायाधीश यांचा समावेश होता. समितीनेही आपले काम सुरू आहे. त्यांनी आपल्या नेतृत्वाखालील १७ वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील आशियाई चॅम्पियनशिप संघांसाठी निवड चाचणी आणि निवड समितीची घोषणा केली. मात्र, आयओएने कुस्ती संघटनेवर स्थगिती आदेश काढला नाही. त्यामुळे कुस्ती संघटनेचे सरचिटणीस व्ही.एन .प्रसूद हे कुस्ती संघाचे काम सुरू ठेवताना ईमेल व इतर साधनांचा वापर करत होते.

कागदपत्रे मागवली, ४५ दिवसांत निवडणुका

विनेश-बजरंग यांचा समावेश

जंतरमंतरवर संपावर गेलेले कुस्तीपटू बजरंग आणि विनेश फोगट यांना आशियाई खेळ आणि ऑलिम्पिकची तयारी करणाऱ्या टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीममध्ये कायम ठेवण्यात आले आहे.

ब्रिजभूषण यांचा कार्यकाळ संपला

कुस्तीपटूंवरील लैंगिक शोषणाच्या आरोपांनी घेरलेले ब्रिजभूषण शरण सिंह यांनी अध्यक्ष म्हणून ४ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. क्रीडा संहितेनुसार त्यांना आता या पदासाठी अपात्र ठरवण्यात आले आहे. जानेवारीमध्ये कुस्तीपटूंच्या पहिल्या संपाच्या वेळी क्रीडा मंत्रालयाकडून ब्रिजभूषण यांना महासंघाच्या सर्व उपक्रमांपासून दूर राहण्यास सांगण्यात आले होते. तसेच, त्यांचे कामकाज आयओएने स्थापन केलेल्या निरीक्षण समितीकडे सोपवले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)